# माणूस

शनिवार
१६ जानेवारी १९७१
चाळीस पैसे




" अहो, हे काय ? एकदा निवडून सत्तेवर तर येऊ द्या.
मग आहेच की भरपूर वेळ. . . ."

शनिवार, १६ जानेवारी १९७१

# माणूस

| वर्ष : ~~सत्तावे~~ दहावे | संपादक | सहाय्यक |
|---|---|---|
| अंक : त्रेपन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
|---|---|---|
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ 'माणूस' मधून आपण उघडलेलं नवीन व्यासपीठ (माझा जाहिरनामा, माणूस, २ जाने. ७१) आवडलं. एकदम पसंद! सामान्य माणसानं 'लिहाय-बोलायची वेळ आलीय्. ठीक आहे. पण सामान्य माणूस कोण? मेंढरासारखं जगणाऱ्या सामान्यांची उदासीनता वेगळेपणानं सांगायला हवी का? श्री. जं. नी मुहूर्ताचा नारळ फोडला. पण ही त्यांची व्यथा आहे का कथा? 'निवडून आलेल्या पक्षाने काय करायला हवे' या त्यांच्या जंत्रीतला पाचवा मुद्दा; अणुबाँब निर्माण करावा, हैड्रोजन बाँबही निर्माण करावा, त्यांचा शक्यतो विकासासाठी उपयोग करावा! आता अणुबाँब-हैड्रोजन बाँब विकासासाठी वापरायचे म्हणजे काय करायचे? श्री. जं. नी खुलासा करावा. हे कलकत्ता : सौ. तारा पंडित–यात नवीन काय आहे? तसेच मराठवाड्याची हालहवाल–इतक्या गौण नोंदीसाठी 'माणूस' कशाला हवा? 'प्रमिला राजे'–श्री. जोंधळे यांची कथा अगदी सुमार आहे!

५ जानेवारी १९७१ — प्रमोद बळवंत जोशी, आंबेजोगाई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

## माझा जाहीरनामा



# लोकशाहीचं विडंबन थांबवलं पाहिजे....

**गोविंदराव शिंदे**
अध्यक्ष, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ

श्री. इंदिराबाई गांधींनी नाही नाही म्हणता म्हणता राष्ट्रपतींना मध्यावधी निवडणुका घ्यायचा सल्ला दिला व आता पार्लमेंटच्या निवडणुकांचा कार्यक्रमही जाहीर झाला आहे. सामान्य माणसाला हा कार्यक्रम समजेपर्यंत निवडणुका होऊनही जातील अशी स्थिती आज दिसते. यावेळी माणूसकारांनी लोकांचे जाहीरनामे फडकवायचं ठरवलं हे पाहून फारच समाधान वाटलं. माणूसमधील त्यांची घोषणा वाचल्यावर आपण काहीतरी लिहावं असं लगेच मनात आलं.

जाहीरनाम्याचा विचार करताना सध्याच्या देशाच्या परिस्थितीचा विचार डोळ्यापुढे चटकन येतो व प्रारंभीच या देशातल्या प्रातिनिधिक लोकशाहीचे संरक्षण करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी करायला पाहिजे असं वाटतं. घटनेने दिलेले भाषण-स्वातंत्र्य व विचार-स्वातंत्र्य आपण सदैव राष्ट्रहित डोळ्यापुढे ठेऊनच वापरले पाहिजे. कोट्यावधी जनतेमधील उपक्रमशीलता, या दृष्टीने, जागृत व क्रियाशील बनवण्याचा प्रयत्न झाला, तरच लोकमताचा अंकुश असलेली खरीखुरी जिवंत लोकशाही या देशात नांदू शकेल. या तातडीने आलेल्या आपल्या देशाच्या पाचव्या निवडणुकीत आपले हे उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीने या संधीचा आपण चांगला उपयोग करून घेतला पाहिजे.

आपल्यासमोर आज सभ्य नागरिक जीवनाची समस्या आहे. परिस्थिती अशी आहे की, नागरिकांसाठी विधायक भूमिकाच उरलेली नाही. लोकशाहीची सफलता नागरिकांच्या सक्रियतेवर अवलंबून असते. नागरिक आज उदासीन, निष्क्रिय आणि दुसऱ्याच्या बुद्धीवर अवलंबित बनला आहे. यामुळे आपली लोकशाही निर्जीव आणि निष्प्रभ बनली आहे. मतदाराच्या जागृत भावनेतून जन्मलेली प्रातिनिधिक सत्ताच

कार्यक्षम व प्राणवान बनू शकेल. आज मतदार झोपलेला आहे. तो हताश बनलेला आहे. या लोकशाहीने आपले कल्याण होणार नाही, म्हणून तो आपल्यासाठी हुकुमशहाची, कैवाऱ्याची, उद्धारकाची वाट पाहू लागतो. अशा परिस्थितीत आता निवडणुका होत आहेत. यावेळी भारतीय लोकशाही अभेद्य व अजिंक्य बनेल असा प्रयत्न व्हायला हवा.

बावीस वर्षांचा स्वराज्याचा कारभार आपल्यापुढे आहे. या कारभारामुळे खेडी पंगु बनली आहेत. तेथील समाजजीवन विस्कटलं आहे. गरीबी व श्रीमंती दोन्ही वाढल्या आहेत. कृषिप्रधान देश असून परदेशांकडे अन्नासाठी भीक मागावी लागत आहे. संरक्षणाकरिता बड्या राष्ट्रांच्या मदतीचाच आधार आहे. अंतर्गत अशांतता विकोपाला गेली आहे. देशात नेतृत्व असे राहिलेले नाही. स्वराज्यातल्या शिक्षणाने जी नवीन पिढी तयार झाली आहे ती समर्थ बनू शकलेली नाही. निवडणुकामुळे जातीयवाद सर्वत्र बोकाळला आहे. लाचलुचपत, काळाबाजार वाढला आहे. महागाईने तर सामान्य माणसाचे जीवन अशक्य करून टाकलं आहे. ही परिस्थिती बदलेल असं सरकार यायला पाहिजे.

यासाठी देशातील करोडो मतदार जागृत व्हायला पाहिजेत. ते देशाचे धनी आहेत. व त्यांनी निवडून दिलेले लोक नोकर आहेत याची जाणीव व्हायला हवी. मतदानाचा हक्क हा विश्वस्तनिधी आहे, त्याची योग्य जपणूक व्हायला पाहिजे. आज मतदार प्रतिनिधींचे गुलाम बनले आहेत. मतदार फक्त पाच वर्षांतून एकदा मत देण्याच्या वेळी जागे होतात. त्यामुळे नोकरच त्यांचे धनी बनले आहेत प्रतिनिधी म्हणून निवडून द्यायचे लोक तसेच जबाबदार असले पाहिजेत. त्यासाठी लोकांनी कोणत्याही पक्षाशी किंवा त्यांच्या भांडणाशी एकरूप होऊ नये. मतदारांनी उमेदवाराचा पक्ष विचारात न घेता त्यांची मते विचारात घ्यावीत. त्यांच्या मता-पेक्षा त्यांचे चारित्र्य लक्षात घ्यावे. चारित्र्यसंपन्न माणूसच त्याला दिलेल्या कोणत्याही पदाला लायक बनू शकेल. त्याच्या हातून चुका घडल्या तरी चालतील. चारित्र्यहीन मनुष्याच्या हातून वरच्या दर्जाची सेवा घडणे अशक्य आहे. यासाठी मतदार हे निःपक्षपाती स्वतंत्र मताचे आणि समजदार असणे आवश्यक आहे. मतदारांना राष्ट्रातील, देशातील घडामोडींसंबंधी आस्था पाहिजे. आपले खाजगी संबंध चांगले आहेत किंवा आपल्या स्वतःच्या गरजेला जे उपयोगी पडले आहेत अशा माणसांनाच मत देणे परिणामी देशाला घातक ठरेल.

मतदारांना आपल्याला हवा तसा उमेदवार दिसला नाही तर त्यांनी मत न दिले तरी चालेल परंतु अयोग्य उमेदवाराला मत देऊ नये. अशा वेळी मत न देणं हेंच कर्तव्य ठरेल. आपल्या देशाच्या सद्यःस्थितीत ज्या पद्धतीने या निवडणुका आल्या आहेत व लढवल्या जाणार आहेत त्यात अनेक ठिकाणी मतदारांना मत न देणेच इष्ट वाटण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत त्याने मत न नोंदवणे हे मत नोंद-

वण्यासारखेच होईल. अशी हिंमत मतदार दाखवू शकले तर या निवडणूकपद्धतीला योग्य वळण लागण्याची शक्यता आहे.

आपल्या घटनेत पक्षाला कोठेच स्थान नाही. आम्ही पाश्चिमात्य निवडणूकपद्धत घेतली व पक्ष आले, त्यामुळे अनिष्ट गोष्टी आल्या, भेद वाढले, खुर्चीसाठी वाटेल ते मार्ग अवलंबण्याची वृत्ती बळावली. जातीयवाद बोकाळला. ज्या जातीभेदावर राजाराम मोहन रॉयपासून महात्मा गांधींपर्यंत सर्वांनी प्रहार केला तो जातीभेद मोडकळीला आला होता, तो आता वाढला आहे. निवडणुकामुळे असे भयानक परिणाम होत आहेत. म्हणून तिच्या पद्धतीचाच विचार करायला पाहिजे. आता ज्याच्याकडे पैसा आहे तोच उमेदवार होऊ शकतो. ' सत्तेच्या प्रलोभनाने चाललेली शर्यत ' असेच आजच्या निवडणुकीचे वर्णन करता येईल. या शर्यतीत भाग घेण गरीब, साध्याभोळ्या आणि प्रामाणिक माणसाला केवळ अशक्य असल्यामुळे तो उदासीन राहतो. आणि मग अनायसेच श्रीमंत, तथाकथित प्रसिद्धीच्या झोतात सदैव वावरणारे व समाजकंटक यांचे फावते. लोकशाहीचे हे विडंबन आपण थांबवलं पाहिजे.

हे सर्व टाळण्यासाठी आपण निवडणूकपद्धतीच बदलली पाहिजे. आता इंडिकेटवाले किंवा बडी आघाडीवाले, मुंबईला व दिल्लीला बसून उमेदवार निश्चित करीत आहेत. अमुक आघाडीचा अमुक उमेदवार ठरला हे मतदार संघातील लोकांना एक दिवस कळणार व त्यापैकी कुणाला तरी मत देण्याची पाळी मतदारांवर येणार. आज मतदार आपला उमेदवार ठरवू शकत नाहीत त्यामुळे ही निवडणूक मतदारांची म्हणजेच लोकांची होऊ शकत नाही. पक्षांची किंवा उमेदवारांची होते. म्हणून मतदारसंघातील गावोगावच्या लोकांनी एकत्र जमून आपले मतदारमंडळ बनवले पाहिजे व त्या मतदारमंडळाने आपला उमेदवार कोण असावा हे ठरवलं पाहिजे. शंभर गावांचा असेंब्लीचा मतदारसंघ असतो. या शंभर गावापैकी प्रत्येक गावात निवडणुकीचा विचार करण्यासाठी लोकांनी सभा घ्यावी व उमेदवार निवडण्यासाठी आपल्या गावचे दोन प्रतिनिधी ठरवावेत. असे दोनशे प्रतिनिधी तालुक्याच्या ठिकाणी जमून आपला उमेदवार निश्चित करतील. अशाच प्रकारे पार्लमेंटच्या मतदारसंघाचे मतदारमंडळ बनवलं जाईल. या उमेदवार निवडीचे नियम ठरवता येतील. अशा प्रकारे मतदारमंडळामार्फत उमेदवार ठरले तर ते लोकांचे उमेदवार ठरतील व स्वाभाविकपणे ते निवडूनही येतील. यामुळे आजची पक्षपद्धती संपेल व त्याबरोबर इतर अनिष्ट गोष्टीही संपतील.

अशा प्रकारे मतदारमंडळे कायम करून लोकांनी जर आपले उमेदवार उभे केले तर पुढचा राज्यकारभारही लोकाभिमुख होईल. अशा पद्धतीत सामान्यपणे हे मतदारमंडळाचे लोक जास्त निवडून येतील ही पद्धत रूढ होईपर्यन्त अन्य लोकही पक्षांचे किंवा स्वतंत्र निवडून येण्याची शक्यता आहे. बहुसंख्य मतदारमंडळाचे लोक

घेतील. मग अशा निवडून आलेल्या लोकांपैकी कोणीतरी सर्व निवडून आलेल्यांची सभा बोलावील व आपण आता निरनिराळे लोक निवडून आले असलो तरी आता पक्षभेद विसरून जनहिताचा राज्यकारभार करू या असं म्हणतील. सर्वांचा समावेश असलेले मंत्रिमंडळ बनेल व निरनिराळ्या खात्याच्या मंत्र्यांसोबत एक समिती असेल. म्हणजे शेतकी मंत्री आहेत. तर जे आमदार निवडून आलेले असतील त्यामध्ये ज्यांना शेतीत रुची असतील त्यातले ते तज्ञ असतील, ते या समितीत सामील होतील. अशी प्रत्येक खात्यासाठी समिती राहील व आपापल्या रुचीप्रमाणे आमदार त्यात सामील होतील. यामुळे प्रत्येक आमदार कोठल्या ना कोठल्या समितीत राहील. या समित्या आपापल्या विषयांची योजना बनवतील, अंमलबजावणी कशी करायची ते ठरवतील व सरकारात ती योजना मंजूर करून घेतील. यामुळे प्रत्येक आमदाराला आपण राज्यकारभार चालवतोय असे वाटेल व ते सक्रिय बनतील, अभ्यासू बनतील. असाच पार्लमेंटचा कारभारही चालू शकेल.

मतदारमंडळे जी बनतील ती कायम राहतील. राज्य सरकारमध्ये व पार्लमेंटमध्ये प्रतिनिधी जे काम करतो त्याची माहिती तो आपल्या मतदारमंडळाला देत राहील. त्याने कसे काम करावे याच्या सूचना वेळोवेळी मतदारमंडळाकडून घेत राहील. आपला एखादा प्रतिनिधी नीट काम करत नाही, असे मतदारमंडळास वाटल्यास त्याला परत बोलावण्याचाही अधिकार या मतदारमंडळाला असला पाहिजे. तसा कायदा जनशक्तीने करवून घेता येईल व त्यामुळे उमेदवार मतदारमंडळाला जबाबदार राहील. आज जो निवडून येतो तो पाच वर्षेपर्यंत राजा बनतो. मतदारसंघाला, पक्षालाही तो जबाबदार रहात नाही. जनतेला तर मुळीच नाही. ही परिस्थिती बदलेल. त्याबरोबरच आजच्या अनिष्ट गोष्टीही संपतील.

असं झालं तर मग जाहीरनामाही लोकांचा होईल. लोक आपला गाव व त्याचा परिसर डोळ्यापुढे ठेऊन आपला जाहीरनामा बनवतील. त्यात पुढील गोष्टींचा अंतर्भाव असण्याची आवश्यकता आहे.

१. आज देशातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते. या खेड्यातल्या जनतेला स्वराज्याची प्रचिती अजून आलेली नाही. त्यासाठी गावपातळीवर असलेली ग्रामपंचायत जाऊन सर्व मतदार असलेले ग्राममंडळ बनावे व गावापुरते विचार करण्याचे या ग्राममंडळाला अधिकार असावेत. या ग्राममंडळात निवडणूक असू नये. सर्वानुमते काम चालावं. ही पद्धत रूढ होईपर्यंत थोडा वेळ लागेल, परंतु एकदा गावच्या लोकांना जबाबदारी कळली व आपल्या जीवनाशी निगडीत प्रश्नाचा संबंध या ग्राममंडळाशी येतो हे लोकांना समजलं तर लोक जबाबदारीने निर्णय घेतील. २. या ग्राममंडळांनी घेतलेल्या योग्य निर्णयांची अंमलबजावणी सरकारने करावी. अयोग्य निर्णय का अयोग्य आहेत ते त्यांना समजावून सांगितले जावे. ३. देशाचा मुख्य उद्योग शेतीचा आहे. त्याची आज नीट व्यवस्था नाही. जमीन ज्याच्याकडे आहे

त्याच्याकडे पक्की राहील अशी व्यवस्था व्हायला हवी. भूमिहीन शेतमजुरांना मोठ्या जमिनदारांची जमीन दिली पाहिजे. कौटुंबिक सीलिंग तर व्हावेच परंतु फ्लोअरिंग असावे म्हणजे किमान इतकी जमीन तरी प्रत्येक शेतीकरणाराला असावी हे व्हावं. या किमान जमीन असलेल्यांना म्हणजेच छोटया शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य मिळावं. त्यांचा शेतसाराही माफ असावा. ४. शेतीला जोडधंदे असे छोटे उद्योग सुरू व्हावेत. ५. पिण्याच्या पाण्याची चांगली व सार्वत्रिक व्यवस्था गावात व्हावी. ६. आजचे शिक्षण कुचकामी आहे. खेडे डोळ्यापुढे ठेउन शिक्षणक्रम बनवावा व त्याची अंमलबजावणी व्हावी. ७. रहाण्यासाठी प्रत्येकास घर मिळावं. ८. काम करू शकणाराला काम मिळावं.

जाहीरनाम्यात कितीतरी वाढ करता येईल. त्याची दिशा वरीलप्रमाणे असावी. आज तावडतोबीने आलेल्या निवडणुकीत वरील विचार होण्याची शक्यता नाही. म्हणून या निवडणुकीच्यावेळी मतदारांनी काय करावे याचा विचार करू. यावेळी वरील उद्देशाला अनकूल ज्या उमेदवाराचे विचार वाटतील त्यांना मत द्यावे. जात-पात, जमात किंवा धर्म यांच्या नावाने मते मागणारांना मुळीच मत देऊ नये. एखाद्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे, वांईट शब्द वापरणे, कुटील डाव खेळणे, पोकळ आश्वासनांची खैरात करणे, संकुचित महत्त्वाकांक्षा, प्रादेशिक दुरभिमान यांचा वापर करणारांना मुळीच मत देऊ नये. उमेदवाराला प्रतिनिधित्वाचा खरा-खुरा अर्थ कळला आहे का हे पहावे. प्रतिनिधी म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्या योग्य-रीतीने पार पाडण्यासाठी त्याच्या ठिकाणी, अभ्यासूपणाबरोबरच त्याची शैक्षणिक, सांस्कृतिक व भावनिक कुवत श्रेष्ठ प्रतीची असावी. उमेदवाराचे वैयक्तिक जीवन सर्व दृष्टीने श्रेष्ठ असलं पाहिजे. उच्च मूल्यांशी प्रामाणिक असणारा उमेदवार नसेल तर मतदानाचा आपला हक्क तसाच राखून ठेवणे योग्य ठरेल. जागृत क्रिया-शील व दक्ष अशा काही व्यक्तींनी जरी निर्धारपूर्वक असे करायचे ठरवले तरी आजचे गढूळ वातावरण बदलून जाईल.

## पुन्हा एकदा—माती जागवील त्याला मत

**रतनलाल भंडारी**

इ. स. १९६७ साली झालेल्या जिल्हापरिषदेच्या निवडणुकीला एक उमेदवार म्हणून मी उभा होतो. सुप्यासारख्या ग्रामीण दुष्काळी भागात निवडणूक लढविताना बाबा आमटे यांचे 'माती जागवील त्याला मत' हे वाक्य मी घोष-वाक्य केले होते. अर्थात त्या निवडणुकीचा अपेक्षित निकाल लागला आणि अगदी

थोडया मताने मी माझे डिपॉझिट वाचविले. मला वाटते तो जाहीरनामा या लोकसभेच्या निवडणूकीसाठी प्रत्येक सामान्य नागरिकाने डोळयासमोर ठेवावयास हरकत नाही. मी त्यात म्हटले होते.



रतनलाल भंडारी

'मित्र हो, तुम्ही भारताच्या नवनिर्मितीच्या संघर्षात आघाडीचे पाईक बनले पाहिजे. निरलस त्याग, नवनिर्मितीची जिद्द आणि शास्त्रशुद्ध योजना यांच्या साहाय्याने दोन इंच पाऊस पडणाऱ्या इस्त्रायलचे नंदनवन होते; तर मग आपल्या या भूमीत नवजीवनाचे मळे का बहरू शकत नाहीत ? म्हणूनच बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे,

प्रत्यक्ष आंदोलनाभिमुख राजकारण
आणि उत्पादनाभिमुख विधायक कार्य
हे दोन्ही पंख उभारून
आता सर्व भारतीय पक्षांचे गरुड उडाले पाहिजेत.
त्या पंखांची ऊब
या उघडया, नागडया, कुडकुडणाऱ्या देशाला मिळाली पाहिजे.

आणि अशा निश्चयाने आपण भारतातील सर्व उसळत्या रक्ताला प्रवाहबद्ध केले तर नवभारतामध्ये एक नवक्रांती आकार घेतल्याशिवाय रहाणार नाही.

'भारतीय सरहद्दीच्या संरक्षणाचा आणि औद्योगिक प्रगतीचा लढा हा भारतातील अशा दुष्काळी, अविकसीत भागातून लढविणे हीच आमची निष्ठा आहे...'

आज देखील माती जागविण्यासाठी हजारो तरुणांचे हात शिवशिवत आहेत. नव्या लोकसभेला या हातांना नेतृत्व द्यावयाचे आहे. ही हिम्मत असणाऱ्या नेत्यांनाच जनतेने लोकसभेत पाठवावे. लोकसभा ही अखिल भारतीय राजकारणाची अग्रणी आहे. तेव्हा तिथे निवड करताना प्रादेशिक प्रश्नांमुळे या निवडणुकीत मतदारांचे चित्त विचलीत होण्याची शक्यता कमी आहे.

कृपा करून या वेळेस जनतेने उमेदवाराने कोणत्या पक्षाचे लेबल लावले आहे या अनैसर्गिक प्रश्नाने फसू नये. अमका पक्ष समाजवादी, तमका प्रतिगामी असल्या ठोकळेबाज लेबलांना बासनात गुंडाळून ठेवावे.

आज आम्हाला राष्ट्रीयीकरण हवे आहे काय ? ते जर एस्. टी. सारखे राष्ट्राच्या फायद्याचे व जनतेच्या फायद्याचे होणार असेल, मागासलेला दुर्गम भाग जर शहरांशी जोडला जाणार असेल, तर जरूर हवे आहे. पण त्यातून राष्ट्राला

नुकसान आणि अव्यवस्था निर्माण होत असेल तर सामान्य माणूस अशा राष्ट्रीयीकरणापासून चार हात दूर पळेल. तेव्हा शासनाने स्वतःची कुवत ओळखून राष्ट्रीयीकरणाच्या लफड्यात नाक खुपसाते, आणि तूर्त दहा वर्षेपर्यंत झालेले राष्ट्रीयकरणच सुविहीत कसे होईल इकडेच लक्ष द्यावे. तोपर्यंत भांडवलदारांची पिळवणूक आम्ही सहन करू.

समाजवादाची गंगा खेड्यात नेण्याच्या नावाखाली अनेक कायदे शासनाने केले आहेत. परंतु ब्रिटीश चौकटीतील नोकरशाहीने या सर्व कायद्यांची पुरती गठडी वळली आहे. तेव्हा नवे कायदे करण्यापेक्षा जुन्या कायद्यातील दोष काढून प्रगतीच्या आड येणाऱ्या नोकरशाहीला, तिच्या खाबूगिरीला आळा बसेल असा कार्यक्रम आखणारा राजकीय पक्ष आम्हाला हवा आहे.

समान संधीच्या सार्थ तत्त्वांचा आधार घ्यावयाचा पण अकार्यक्षम लोकांची केवळ मागासवर्गीय म्हणून शाळांमधून नेमणूक करून प्राथमिक शिक्षणाचा खेळखंडोबा करावयाचा, याचा पुनर्विचार झाला पाहिजे. मागासलेल्या समाजाला ज्या सवलती देण्यात येतात त्यात पाहिजे तर जरूर वाढ व्हावी. पण 'राखीव जागांच्या' निमित्ताने नवा कमजोर 'मार्गदर्शक आदर्श' उभा रहाणार नाही याची काळजी घ्यावी.

परराष्ट्रीय धोरणात आता आपण जगापासून चीनसारखेच स्वतः भोवती 'ज्यूट कर्टन्स' उभारावे. जगातल्या प्रत्येक गोष्टीत नाक खुपसण्याचा उद्योग आपण सोडून द्यावा. नेहरू होते, त्यांचा अधिकारही मोठा होता. ते त्यांना शोभून दिसत होते. तरी त्या प्रवृत्तीमुळे देशाचे नुकसानच झाले आहे.

आपण आता वायफळ बडबड आणि राणा भीमदेवी ॲप्रोच सोडण्याची वेळ आली आहे. मंत्र्यांनी विधिमंडळाशिवाय जाहीर सभातून, मशिदीतून व मंदिरातून, उद्‌घाटनातून भाषणे करण्याचे सोडून द्यावे.

माझ्या जाहीरनाम्यातले हे काही मुद्दे! तुम्हाला ते पटले तर जरूर 'माती जागविण्याची' जिद्द असलेल्या तरुण उमेदवाराला मत द्या. मग तो उमेदवार स्वतंत्र पक्षाचा असला तरी मनात भ्रम निर्माण होऊ देऊ नका.

ता. क. महागाई कमी करू म्हणून आश्वासन देणाऱ्या पक्षाला मुळीच मत देऊ नका. तर अधिक महागाई होऊ देणार नाही म्हणणाऱ्यालाच मते द्या.

□ □ □

# बंगालची अस्थिरता निवडणुकीनंतरही कायम राहण्याचा संभव

## वा. दा. रानडे

लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुकीबरोबर पश्चिम बंगालच्या विधानसभेच्या निवडणुका घेण्याचा निर्णय अखेर केंद्र सरकारने घेतला. हा निर्णय योग्य आहे का? पश्चिम बंगालमध्ये विशेषत: कलकत्यात खून, मारामाऱ्या, बाँबफेक, जाळपोळ, भोसकाभोसकी हे प्रकार रोज चालू आहेत. जादवपूर विद्यापीठाच्या उपकुलगुरुंचा खून आणि चित्तरंजन येथील स्टेट बँक शाखेवर अठरा लाख रुपयांचा दरोडा या अगदी अलीकडच्या दोन घटना. अशा परिस्थितीत निवडणुका शांत व खुल्या वातावरणात कशा होणार? कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित होईपर्यंत तेथे निवडणुका घेऊच नयेत असे विरोधी पक्षाच्या, विशेषत: उजव्या गटाच्या नेत्यांचे म्हणणे आहे. पश्चिम बंगालमध्ये अजून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली नाही हे खरे, पण म्हणून निवडणुका दीर्घकाल लांबणीवर टाकणे लोकशाहीविरोधी आहे. निवडणुका नको आहेत फक्त नक्षलवाद्यांना. पोलीस व लष्कराचा कडक बंदोबस्त नक्षलवादी विशेष काही करू शकत नाहीत हे 'बंगाल बंद'च्या वेळच्या बंदोबस्तावरून दिसून आले आहे. कडक बंदोबस्ताची व्यवस्था केली तर निवडणुका शांतपणे पार पडू शकतील.

पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका घेण्याचा निर्णय योग्य आहे. तो यापूर्वीच घेण्याचे धैर्य इंदिरा सरकारने दाखवायला हवे होते. पण इंदिरा गांधींनी हा निर्णय योग्यायोग्यतेची कसोटी लावून घेतलेला नसून निवडणुकीचे राजकीय गणित करून घेतलेला आहे. डाव्या-उजव्या कम्युनिस्टातील फुटीचा फायदा घेऊन पश्चिम बंगालमध्ये पुन: सत्तारूढ होता आले तर इंदिरा-काँग्रेसला ते हवेच आहे. दोन्ही कम्युनिस्ट आघाड्यातच केवळ फूट आहे असे नव्हे तर बंगला-काँग्रेसचेही

त्यांच्याशी बिनसले आहे. उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आठ पक्षांच्या आघाडीत सामील न होण्याचा निर्णय बंगला-काँग्रेसने घेतला आहे. इंदिरा काँग्रेसच्या दृष्टीने आणखी अनुकूल घटना म्हणजे बंगला-काँग्रेस व इंदिरा-काँग्रेसच्या नेत्यांनी सहकार्याची बोलणी केली व त्यात समाधानकारक प्रगती होत असल्याच्या बातम्या दिल्लीत आल्या. एकीकडे कम्युनिस्टात फूट पडली असता दुसरीकडे इंदिरा-काँग्रेस व बंगला-काँग्रेस एकत्र आल्या तर बंगालची सत्ता आपण पुन: मिळवू अशी स्वप्ने इंदिरा-काँग्रेसच्या नेत्यांना दिसू लागली व त्यांनी निवडणुकांचा निर्णय घेतला.

पण त्यांनी हा निर्णय दिल्यानंतर काही तासातच आलेल्या बातमीने त्यांच्या साऱ्या आशाआकांक्षांवर पाणी पडले. इंदिरा-काँग्रेस व बंगला-काँग्रेस नेत्यांच्या वाटाघाटी फिसकटल्या. इंदिरा-काँग्रेसला पश्चिम बंगालमध्ये आता बहुमत तर नाहीच, पण पूर्वीइतक्या जागा तरी टिकवता येतील की नाही याची शंका आहे. निवडणुकांचा निर्णय जाहीर करण्यात आपण घाई केली. इंदिरा-काँग्रेस व बंगला-काँग्रेस यांच्यातील वाटाघाटीची निश्चित निष्पत्ती कळेपर्यंत आपण थांबायला हवे होते असे इंदिरा गांधींना नंतर वाटले असेल.

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकांचा घाट इंदिरा गांधींनी घातला खरा, पण तो त्यांच्या अंगाशी येणार काय? लोकसभेच्या गेल्या चार निवडणुका, विधानसभेच्या पाच निवडणुका आणि गेल्या एक वर्षातील परिस्थिती या पार्श्वभूमीवर या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. सत्ता मिळविण्याच्या दृष्टीने जागा जिंकण्याला महत्त्व आहे हे खरे; पण लोकमनाचा कौल कोणत्या पक्षास किती मते मिळाली यावरूनच व्यक्त होत असतो. लोकसभेच्या चार निवडणुकात पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसला १९५२ मध्ये ४२·१ टक्के, १९५७ मध्ये ४८·२० टक्के, १९६२ मध्ये ४६·७८ टक्के व १९६७ मध्ये ३९·६९ टक्के याप्रमाणे मते मिळाली. चार निवडणुकात काँग्रेसने १९५७ साली सर्वात जास्त म्हणजे ४८·२० टक्के मते मिळविली होती. तीही पन्नास टक्क्यांपेक्षा कमीच होती. चारही निवडणुकात बहुसंख्य लोकमत काँग्रेसविरुद्धच होते गेल्या दहा वर्षात मतांची घट होतच होती. काँग्रेसने १९६२ मध्ये १९५७ पेक्षा १·४२ टक्के मते कमी मिळविली. १९६७ मध्ये ही घसरगुंडी आणखी वाढली. १९६२ पेक्षा १९६७ मध्ये ७·०९ टक्के मते कमी मिळाली आणि १९५७ पेक्षा तर हे प्रमाण ८·५१ टक्क्यांनी कमी आहे.

जागांच्या दृष्टीने विचार केला तर पश्चिम बंगालमधील लोकसभेच्या एकूण ४० जागांपैकी फक्त १४ जागा काँग्रेसने १९६७ मध्ये जिंकल्या.

काँग्रेसपक्षातील मोठ्या फुटीनंतरची ही पहिलीच लोकसभा निवडणूक आहे. लहान प्रमाणावर फूट यापूर्वीच पडलेली आहे. १९६७ च्या निवडणुकांचे वेळी श्री. अजयकुमार घोष यांच्या नेतृत्वाखाली एक गट बाहेर पडून त्याने बंगला-काँग्रेस नावाने निवडणुका लढविल्या व लोकसभेच्या ५ जागा आणि ९·३६ टक्के मते

मिळविली. पण बंगला-काँग्रेसने केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर एवढ्या जागा व मते मिळविलेली नाहीत हे येथे लक्षात घेतले पाहिजे. उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील संयुक्त आघाडीत बंगला-काँग्रेस सामील झालेली होती. आघाडीतील घटक-पक्षांच्या पाठिंब्याचा यात वाटा आहे.

काँग्रेसमधील मोठ्या फुटीनंतर तर इंदिरा-काँग्रेसला पश्चिम बंगालमध्ये १९६७ एवढेही यश मिळणे कठीण आहे. दोन्ही पक्षांचे नेते बाह्यतः या सर्वात नसले तरी फुटीमुळे दोन्ही काँग्रेस पक्ष कमकुवत झाले आहेत. तरीही या दोन काँग्रेस पक्षांमध्ये कोणाला पाठिंबा अधिक आहे हे या निवडणुकीवरून दिसून येईल. निजलिंगप्पा-काँग्रेस सर्व जागा लढविणार आहे व आपण चांगलेच यश मिळवू असा विश्वास त्या पक्षाचे नेते व्यक्त करीत आहेत. दोन्ही कम्युनिस्ट आघाड्या, बंगला-काँग्रेस, इंदिरा-काँग्रेस यांच्यात मते विभागली जाऊन त्याचा फायदा आपल्याला मिळेल असा त्यांचा कयास आहे. गेल्या निवडणुकीत काँग्रेसने जवळजवळ ४० टक्के मते मिळविली ती सर्व आपणालाच मिळतील. इंदिरा-काँग्रेसला काही मिळणार नाहीत असे ते गृहीत धरून चालले आहेत. पण हे स्वप्नरंजन असून त्याला वस्तुस्थितीचा आधार नाही. विरोधी पक्षांची मते यावेळी फुटतील पण त्याचा फायदा निजलिंगप्पा-काँग्रेसलाच मिळेल कशावरून? उलट मार्क्सवादी कम्युनिस्टांनाच याचा फायदा मिळण्याचा अधिक संभव आहे. केरळमधील १९५७ च्या निवडणुकांचे निकाल या दृष्टीने बोलके आहेत. त्यावेळी कम्युनिस्टांनी कोणाशीही आघाडी न करता केवळ स्वतःच्या बळावर निवडणुका लढविल्या होत्या. एकेका जागेसाठी अनेक पक्षांचे उमेदवार उभे राहिले त्याचा फायदा काँग्रेसला न मिळता कम्युनिस्टांना मिळाला व बहुमत मिळवून पहिले कम्युनिस्ट सरकार केरळमध्ये अधिकारावर आले. पश्चिम बंगालमध्येही असंच घडून मार्क्सवादी अधिकारावर येण्याची शक्यता आहे.

पूर्वी अविभक्त काँग्रेसला मिळालेली ४० टक्के मते आपल्यालाच मिळतील हा निजलिंगप्पा-काँग्रेसच्या नेत्यांचा आशावादही वस्तुस्थितीवर आधारलेला नाही. वारा कोणत्या दिशेने वहात आहे हे दर्शविण्यास पोटनिवडणुकांचे निकाल पुरेसे बोलके आहेत. काँग्रेसमधील फुटीनंतर मिदनापूरची विधानसभेची व बशीरहाटची लोकसभेची जागा निजलिंगप्पा-काँग्रेसने लढविली, पण दोन्ही मतदारसंघात त्यांच्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. इंदिरा-काँग्रेसच्या उमेदवारांनाही कमीच मते मिळाली पण निजलिंगप्पा-काँग्रेसइतकी तिची स्थिती केविलवाणी नव्हती.

जनसंघ, स्वतंत्र पक्ष, सयुक्त समाजवादी यांच्याशी राष्ट्रीय पातळीवर केलेल्या आघाडीचा फायदा निजलिंगप्पा-काँग्रेसला पश्चिम बगालमध्ये मिळणार नाही. या आघाडीपैकी संयुक्त समाजवादी उजव्या कम्युनिस्टांच्या आघाडीत सामील आहेत. आणि जनसंघ व स्वतंत्र पक्ष बंगालमध्ये अगदीच नाममात्र आहेत.

केरळ निवडणुकीत मार्क्सवाद्यांनी एक दोन ठिकाणी आपला उमेदवार उभा न

करता निजलिंगप्पा-काँग्रेसला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला होता पण पश्चिम बंगाल-मध्ये तसे घडण्याची शक्यता नाही. कारण बंगालमध्ये राजकीय पक्षांचे ध्रुवीकरण केरळपेक्षा अधिक टोकाला गेले असून आपली एक जागाही वाया घालविण्याची मार्क्सवादी कम्युनिस्टांची तयारी नाही.

केरळप्रमाणे उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडी व बंगला-काँग्रेसशी युती करून अधिक जागा मिळवता येतील असा इंदिरा-काँग्रेसच्या नेत्यांचा मनसुबा होता. पण तो फसला. केरळप्रमाणेच बंगालमध्ये उजवे कम्युनिस्ट आघाडी व इंदिरा-काँग्रेस यांची युती झाली नाही याचे कारण अशा युतीला संयुक्त समाजवादी पक्ष पुरोगामी गट, सोशॅलीस्ट युनिटी सेंटर या पक्षांचा तीव्र विरोध होता. इंदिरा-काँग्रेसशी तुम्ही युती करणार असाल तर आघाडीतून बाहेर पडू असा इशारा संयुक्त समाजवादी पक्षाने उजव्या कम्युनिस्टांना दिला होता. आघाडीच फुटण्याचा धोका निर्माण झाल्यावर उजव्या कम्युनिस्टांनी हा विचार सोडून दिला.


# विचार - धन

'बंच ऑफ थॉट्स' या गाजलेल्या इंग्रजी ग्रंथाची
मराठी आवृत्ती आम्ही प्रकाशित करीत आहोत.

या ग्रंथात श्री. मा. स. गोळवलकर यांच्या विविध विषयांवरील विचारांचे संकलन आलेले असून ते आजच्या परिस्थितीत विशेष मार्गदर्शक ठरेल.

पृष्ठे : सुमारे ४०० डेमी : कापडी बांधणी : मूल्य पंधरा रुपये

**हा ग्रंथ येत्या विजयादशमीपूर्वी प्रसिद्ध होईल.**

**प्रसिद्धीपूर्व सवलत**

माघ शु. १५, शके १८९२ दि. १०।२।७१ पावेतो आगाऊ रक्कम भरणारांना हा ग्रंथ केवळ दहा रुपयांनाच मिळेल.

( डाकव्यय दीड रुपया वेगळा )

**स्थानिक विक्रेत्यांकडे अगर आमच्याकडे लिहा.**

## हिंदुस्थान साहित्य

३०९ शनिवार पेठ, मोतीबाग, पुणे ३०

इंदिरा-कांग्रेस—बंगला-कांग्रेस वाटाघाटी जागा वाटपाच्या प्रश्नावर फिसकटल्या. इंदिरा-कांग्रेसला लोकसभेसाठी जादा जागा देण्यास बंगला-कांग्रेसची तयारी होती. पण त्याबदलात विधानसभेत आम्हाला जास्त जागा हव्या, अशी त्यांची मागणी होती. केंद्र व राज्य दोन्ही पातळीवर इंदिरा-कांग्रेसच्या नेत्यांना आपले वर्चस्व हवे होते. बंगला-कांग्रेसने ते मान्य न केल्यामुळे बोलणी मोडली, पण त्याचा परिणाम इंदिरा-कांग्रेसला तर कमी जागा मिळतीलच पण बंगला-कांग्रेसलाही कमी जागा मिळतील.

पश्चिम बंगालमध्ये १९६७ च्या लोकसभा निवडणुकीत निरनिराळ्या राजकीय पक्षांना पुढीलप्रमाणे जागा मिळाल्या. एकूण जागा ४०, कांग्रेस १४, उजवे कम्युनिस्ट ५, डावे कम्युनिस्ट ५, बंगला कांग्रेस ५, पुरोगामी गट २, संयुक्त समाजवादी १, प्रजासमाजवादी १, अपक्ष ७. स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ या उजव्या गटाच्या पक्षांना एकही जागा मिळाली नाही. स्वतंत्र पक्षाच्या सर्वच्या सर्व तीन व जनसंघाच्या सातपैकी सहा उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली.

मतांच्या दृष्टीने सर्वात जास्त ३९.६९ टक्के मते कांग्रेसने मिळविली. मार्क्सवादी कम्युनिस्ट १५.६५, उजवे कम्युनिस्ट ९.१४, बंगला कांग्रेस ९.३६, प्रजासमाजवादी १.७०, संयुक्त समाजवादी १.४९ जनसंघ, १.३९, स्वतंत्र पक्ष ०.७७, रिपब्लिकन पक्ष ०.६६ इतर पक्ष ४.८८, अपक्ष सभासद १५.२८ टक्के असे इतर पक्षांचे मतदान होते.

विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका फेब्रुवारी १९६९ मध्ये झाल्या. त्यात डाव्यांच्या संयुक्त आघाडीने २८० पैकी २१४ जागा जिंकून घवघवीत बहुमत मिळवले. डावे व उजवे कम्युनिस्ट, आणि बंगला कांग्रेस इतर छोटे डावे गट यांची एक आघाडी स्थापन झाल्यामुळेच एवढे प्रचंड यश मिळू शकले. कांग्रेसला मते ४१.२ टक्के मिळाली पण जागा फक्त ५५ मिळाल्या. १९६७ च्या निवडणुकीत कांग्रेसने १२७ जागा व ४१.१ टक्के मते मिळवली होती. मतांच्या दृष्टीने कांग्रेसच्या पाठिंब्यात फरक पडला नाही पण जागांच्या बाबतीत मात्र कांग्रेसने घसरगुंडीचा नवा उच्चांक नव्हे नीचांक गाठला. १९६७ पेक्षा ७८ जागा कांग्रेसला कमी मिळाल्या. यावेळी विरोधी पक्षांची एक आघाडी नसल्याने इंदिरा-कांग्रेस थोडया अधिक जागा मिळविल पण पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणूनही तो निवडून येणे कठीण आहे.

विधानसभेत कोणत्याच पक्षाला निर्णायक बहुमत मिळण्याची शक्यता दिसत नाही. मार्क्सवाद्यांची आघाडी सर्वात जास्त जागा मिळविल, पण सरकार बनविण्यासाठी इतर पक्षांवर अवलंबून रहावे लागेल. अशा परिस्थितीत निवडणुकीनंतरही बंगालमध्ये अस्थिरताच कायम राहील असे दिसते.

□ □ □

आम्हाला इंग्रजी हेच माध्यम पाहिजे आहे— **विद्यार्थी**

ज्यांना तामिळ येत नाही त्यांना बंगालच्या
उपसागरात बुडविले पाहिजे— **अरंगण्णल**

# मद्रास तामिळनाडू

**विजय वैद्य**

तामिळनाडू राज्यातील सर्वच विद्यापीठातील विद्यार्थी सध्या नाताळाची सुट्टी उपभोगीत आहेत. १० डिसेंबर रोजी ही सुट्टी सुरू झाली. म्हणजे नाताळा-पूर्वी सुमारे १५ दिवस आधी आणि अजूनही ती संपलेली नाही. राज्यातील सर्वच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना १० डिसेंबरपासून वातावरण पूर्ववत होईपर्यंत सुट्टी द्यावी असा डी. एम्. के. सरकारनेच आदेश दिला होता आणि अजूनही वातावरण निवळलेले नसल्याने व विद्यार्थी पुनश्च संतप्त होतील अशी सरकारला भीती वाटत असल्याने अजूनही विद्यार्थी वर्गात बसू शकत नाहीत. (याला अपवाद फक्त वैद्यकीय व इंजिनियरींग महाविद्यालये.)

पण अशी परिस्थिती निर्माण होण्याचे कारण तरी काय घडले, की त्यामुळे सरकारला असा आदेश द्यावा लागला ?

दिनांक ९ डिसेंबर रोजी सुमारे २ हजार संतप्त विद्यार्थ्यांनी मद्रास येथील राज्य सचिवालयापुढे उग्र निदर्शने केली आणि त्यांना पांगविण्याकरिता पोलिसांनी लाठीहल्ला केला, अश्रुधाराचा वापर केला, यामुळे विद्यार्थी अधिकच भडकले आणि त्यांनी पोलिसांवर दगडफेक सुरू केली. आगगाड्या व बसेसवर हल्ले केले, स्थानकांची नासधूस करायला आरंभ केला. विद्यार्थी प्रथम शांतच होते आणि मुख्यमंत्री श्री. करुणानिधी आणि शिक्षणमंत्री श्री. नेडुनझेडियन यांची भेट घेऊ

इच्छित होते पण 'उन्हात तापणाऱ्या व भडकलेल्या विद्यार्थ्यांची त्यांनी भेट घेऊ नये' अशी विनंती सचिवालयातील सुरक्षा अधिकाऱ्यांनी केली व ते दोघेही दुसऱ्याच मार्गाने सचिवालयातून बाहेर पडले. 'आपण त्यावेळी सचिवालयात नव्हतोच' असा त्यांनी दावा केला होता, पण माहितगार गोटांचे म्हणणे आहे, की ते काही खरे नव्हे. त्यामुळेच विद्यार्थी चिडले. याआधी मद्रासच्या जैन कॉलेजातील सर्व विद्यार्थी वर्गाबाहेर पडले आणि ते गटागटाने सचिवालयाकडे जाऊ लागले होते. पोलिसांकडून झालेल्या लाठीहल्ल्यात सुमारे ३६ विद्यार्थी जखमी झाले तर विद्यार्थ्यांनी केलेल्या दगडफेकीत काही पोलिस अधिकाऱ्यांसहित सुमारे २० पोलिस जखमी झाले. ३ हजार विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली, पण दुसऱ्या दिवशी त्यांना सोडण्यात आले. हे सर्व घडण्यामागचे खरे कारण होते. विद्यापीठाच्या माध्यमाबाबतचा राज्यसरकारचा निर्णय पुढील शैक्षणिक वर्षापासून इंग्रजीऐवजी तामिळ माध्यमाचा महाविद्यालयांनी स्वीकार करावा असा आदेश असलेली परिपत्रके राज्यसरकारने महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली. अर्थातच ही परिपत्रके नोव्हेंबरातच पाठविण्यात आली होती आणि त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी म्हणजे माजी मुख्यमंत्री कै. अण्णादुराई यांच्या ६२ व्या वाढदिवशी यांची जाहीर घोषणा करण्यात आली. त्यामुळे नव्या आदेशावर निरनिराळ्या प्रतिक्रिया होत असतानाच हळूहळू वातावरण तापत चालले होते. त्यातच निरनिराळ्या महाविद्यालयातील इंग्रजी माध्यम चालू रहावे याचा पाठपुरावा करणारे विद्यार्थी आणि तामिळ माध्यमाचे पाठिराखे यांच्यात चकमकी उडू लागल्या. मद्रासच्या सुप्रसिद्ध प्रेसिडेन्सी कॉलेजातील सुमारे २०० तामिळ माध्यमाच्या पाठिराख्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमवाल्यांविरुद्ध निदर्शने सुरू केली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून मग सरकारला वरील आदेश द्यावा लागला.

मद्रास येथील महाविद्यालये बंद झाली पण त्यांची प्रतिक्रिया सलेम, वेल्लोर, पाल्लयमकोटाई, पोलांची, मदुराई, येथे झाली. आणि महाविद्यालये तसेच शाळेतील विद्यार्थी सरकारच्या धोरणाचा निषेध म्हणून गैरहजर राहिले. पोलांची व पाल्लयमकोटाई येथे अनुक्रमे १२०० व ६०० विद्यार्थी महाविद्यालयातून अनुपस्थित राहिले. सलेम येथील म्युनिसिपल गर्ल्स हायस्कूलमधील मुलींनी शाळा बंद पाडली. तर मद्रासच्या रामकृष्ण मिशनच्या हायस्कूलमधील ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी 'परिक्षेला बसण्याची मनस्थिती नाही.' या सबबीखाली दुसऱ्या सत्राच्या परिक्षेला बसण्याचे साफ नाकारले. हळूहळू हे लोण सबंध राज्यभर पसरले. यावरून माध्यमातील बदलाबाबत महाविद्यालतीलच नव्हे तर शालेय विद्यार्थ्यांच्याही भावना किती तीव्र आहेत यांची कल्पना येईल. अलीकडे मला मद्रास येथे काही विद्यार्थी, प्राध्यापक व इतर अनेकांशी या प्रश्नाबाबत बोलण्याची संधी मिळाली.

माध्यमबदलाच्या प्रश्नामुळे मद्रास आणि तामिळनाडू राज्यातील शिक्षणक्षेत्रात

आज चिंतेचे वातावरण पसरले आहे. सरकार, विद्यार्थी, शिक्षक, पालक, राजकारणी सर्वच जण चिंतातूर आहेत. भावना अधिक भडकू नयेत म्हणून मलमपट्टी करणारे काही निर्णय घेण्यात आले असले तरी वातावरण पुन्हा तप्त होणार नाहीच असे नाही. पण हे सर्व घडण्यासाठी जे तात्कालिक कारण घडले, जी चूक झाली, ती चूक, राज्यकर्ता डी. एम्. के. पक्ष, मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांनी केली. खरं म्हणजे त्यांनीच भावना भडकविण्याचे कार्य केले आणि अशाच संधीची वाट पहात असलेले इतर राजकीय पक्षही मग हातात शेणाचे गोळे घेऊन सज्ज झाले.

(पासष्ठ साली भक्तवत्सलम सरकार (काँग्रेस सरकार) अधिकाररूढ असताना हिन्दीविरोधी आंदोलनात डी. एम्. के. ने हात धुऊन घेतले होते. आता ही बाजू त्यांच्यावर उलटून काँग्रेस (सत्तारूढ आणि संघटना काँग्रेसही) हाच खेळ खेळत आहे.)

त्याचे असे झाले की तामिळनाडू विधान सभेत मुख्यमंत्री श्री. करुणानिधी यांनी एक खळबळजनक विधान केले. ते विधान होते–' साधारणपणे १० ते १५ वर्षांनी या विधानसभेला असा एक कायदा करावा लागेल की तामिळनाडूतील ज्या व्यक्तींना तामिळ येत नाही किंवा तामिळ माध्यमातून पदवीधर झालेल्याला जे उद्योगधंदे, नोकऱ्या देणार नाहीत त्यांना शिक्षा करण्याची त्या कायद्यानुसार तरतूद असेल.' यामुळे वातावरण तप्त होत असतानाच विधानसभेतच असाच दुसरा प्रकार घडला. विधानसभेचे एक सदस्य श्री. शिवांगनम यांच्या माध्यमासंबंधीच्या एका बिनसरकारी ठरावावर चर्चा चालू असतानाच डी. एम्. के. चे एक आमदार श्री. अरंगण्णल उठले आणि म्हणाले, ' ज्यांना तामिळ येत नाही त्यांना बंगालच्या उपसागरात बुडविले पाहिजे.' या विधानाला मुख्यमंत्र्यांसह इतर डी. एम्. के. सदस्यांनीही पाठिंबा दर्शविला : अशा बेजबाबदार विधानांची प्रतिक्रिया न होती तरच नवल. मुख्यमंत्र्यांना खुलासा करावा लागला की त्यांच्या ' शिक्षेचा कायदा ' विधानाबाबत लोकांनी गैरसमज करून घेतला आहे.

हे सर्व झाल्यावर अर्थातच सारवासारव करणे आवश्यक होते म्हणूनच मग मुख्यमंत्र्यांनी, या वादग्रस्त प्रश्नाचा अभ्यास 'करून तामिळ माध्यम स्वीकारले असता आपला तोटा होईल ' ही विद्यार्थ्यांच्या मनात जी भिती आहे ती दूर करून उलट तामिळचा स्वीकार केल्यामुळे विद्यार्थ्यांपुढे उज्वल भविष्यकाळ हात जोडून उभा रहाणार आहे हे दाखवून देण्याकरता एका मंडळाची स्थापना केल्याचे घोषित केले. एवढेच नव्हे तर तामिळ विद्वान, प्राध्यापक, आमदार, विरोधीपक्ष नेते यांची एक तातडीने बैठक बोलावून या प्रश्नाचा त्यांनीही अभ्यास करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. विद्यार्थ्यांनीही चळवळीचा मार्ग सोडावा अशी त्यांची विनवणी करण्यात आली. शिवाय डी. एम्. के. च्या नेतृत्वाखालील सात

पृष्ठ ५३ वर

# निवडणुकीची वावटळ

अशीच एक वावटळ येते आणि सारे जीवन ढवळून निघते. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांच्या निमित्ताने ही वावटळ गोव्यात येत आहे. याचसुमारास पेडणे या गोवा विधानसभेच्या मतदारसंघातील पोट निवडणूकही होत आहे. आमदार बाबल किनळेकर यांच्या निधनाने रिकामी झालेली ही जागा. तिथे चौरंगी सामना होतो आहे. नवी व जुनी कॉंग्रेस, कम्युनिस्ट व सत्ताधारी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष एवढयांचे उमेदवार तेथे उभे आहेत. निवडणूक अटीतटीची आहे, प्रतिष्ठेची आहे. तशीच १९७२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांचे चित्र बऱ्याच अंशी स्पष्ट करणारी ठरणार आहे.

सत्ताधारी म. गो. पक्षाचा बालेकिल्ला म्हणावा अशी ही जागा. परंतु गेल्या सहा महिन्यात गोव्यात जी काही राजकीय उलथापालथ झाली त्याचा एक संभाव्य परिणाम म्हणून या निवडणुकीकडे पहावे लागत आहे. आणि दुसरे म्हणजे नवकॉंग्रेसने आपली सारी शक्ती येथे पणाला लावली आहे. खुद्द म. गो. ची एकेकाळी नेते म्हणविणारी श्री. डिसूझा, श्री. गोपाळ मयेकर आदी मंडळी आणि श्री. मोहन रानडे, डॉ. तेलू मस्कारेन्यश असे सर्व रथी-महारथी पुढे सरसावले आहेत. पैसा, माणसे, शक्ती हे सारे नगण्य स्वरुपात कॉंग्रेसने तिथे उभे केले आहे.

परंतु लोकांकडे मते मागायला जाणाऱ्या या कॉंग्रेसने गेल्या दहा वर्षात कोणता कार्यक्रम येथे हाती घेतला आणि त्याच्या कार्यवाहीबद्दल आग्रह धरला. या प्रश्नाला येथे कोणाकडेच उत्तर नाही. दुसरे म्हणजे समाजवादाची घोषणा करणाऱ्या या कॉंग्रेसचे पेडण्यातील खरे सूत्रधार आहेत श्री. रघुराज रावराजे देशप्रभू, साऱ्या पेडण्यावर अनिर्बंध सत्ता गाजविणारे श्रीमंत असे हे घराणे. पोर्तुगीजांनी यांना दिलेला 'व्हायकाऊंट' हा किताब ! पेडण्यातील अर्ध्याहून अधिक जमिनी यांच्या मालकीच्या ! त्यामुळे पेडणेकर नावाने ओळखले जाणारे हे जमीनदार तेथील लोकांना अत्यंत अप्रिय !

डावे कम्युनिस्ट श्री. नारायण देसाई हेही येथून निवडणूक लढवीत आहेत. वास्तविक त्यांचे आणि नवकॉंग्रेसचे सख्य होणे अजिबात अवघड नव्हते. त्यांच्यावर तसे दडपणही होते म्हणे. परंतु 'गोव्यातील कॉंग्रेस भांडवलदारांची, जमीनदाराची,' अशी टीका ते करीत आहेत.

पेडण्यात आपणास भरपूर पाठिंबा आहे असे सांगणाऱ्या संघटना कॉंग्रेसनेही आपला उमेदवार तिथे उभा केला आहे. परंतु त्यांच्याच एका नेत्याने परवा खाजगी रीत्या बोलताना कबूल करून टाकले की आजतरी बांदोडकरांना चान्सेस आहेत.

बांदोडकरविरोधी गटाचे श्री. कृष्णनाथ बाबूराव नाईक वगैरेनी आज तरी मौन पाळलेले आहे. आपला उमेदवार ते उभा करणार असल्याची अगोदर वार्ता होती. पण मागाहून त्यांनी तो निर्णय बदलला. कदाचित उमेदवार उभा करून तो निवडून येणार नाहीच परंतु तिसऱ्यांना संधी मिळण्यापेक्षा श्री. बांदोडकर परवडले असा पोक्त विचार यात असावा. तसेच डिसूझा अदी मंडळींनी केलेल्या विश्वासघातानतर आपल्या बांदोडकरविरोधी धोरणाचा फेरविचार ही मंडळी करू लागली आहेत असे त्यांच्याच वक्तव्यावरून वाटते. कदाचित बांदोडकरविरोध आपल्याला परवडणारा नाही या भूमिकेतून असेल अगर आपण चुकीच्या मार्गाने जात आहोत, जनतेच्या दृष्टीने बांदोडकरच बरोबर असल्याची खात्री पटल्यानेही असेल, परंतु ते खूप मवाळ झालेत एवढे निश्चित. माझ्या माहितीनुसार दुसरेही एक कारण म्हणजे सुरवातीला या साऱ्या घडलेल्या राजकारणामागे असलेले येथील प्रमुख उद्योगपती. त्यांना वाटते की या आमदारांनी आमच्या म्हणण्यानुसार चालावे. आपण म्हणताच त्यानी कॉंग्रेस प्रवेश करावा, स्वतंत्र विचारच करू नये यासाठी त्याच्यावर दडपण आणले जात होते. परंतु या लोकांनी त्याला नकार दिला आणि त्यामुळेच आता 'पुनरागमनायच' हा एकमेव पर्याय शिल्लक राहिल्याने त्या दृष्टीनेच वागण्यास त्यांनी सुरवात केली.

या साऱ्या पार्श्वभूमीवर या पोटनिवडणुकीचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. सध्या नवकॉंग्रेसच्या प्रेमात पडलेली डिसूझा-मयेकर मंडळी तिथे प्रचार करीत आहेत. एक गमतीची गोष्ट या संदर्भात प्रत्यक्ष ऐकली. स्वतः एकेकाळी मंत्री असलेल्या मयेकरांनी प्रचार सभेत सांगितले,

'या बांदोडकरांनी सत्तेवर राहूनसुद्धा तुमच्यासाठी काहीच केले नाही.'

आणि दुसऱ्या एका सभेत बोलताना सांगितले,

'मी हे केले, ते केले असे बांदोडकर सांगतात. परंतु ते काहीच करू शकत नाहीत. त्यांचे हात दिल्लीने बांधून टाकलेले आहेत.'

ही परस्परविरोधी विधाने.

एका ठराविक वृत्तपत्रात रकानेच्या रकाने भरून येणारा हा मजकूर व्यवस्थित वाचून पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली ती ही की – 'आपण काय करणार आहोत; आथवा 'कॉंग्रेस तुमच्यासाठी काय करणार आहे यावर कुणीच बोलत नाही. फक्त घाणेरड्या आरोपांनी भरलेली टीका सत्तारूढ पक्षावर केली जाते.

आणि या साऱ्या गदारोळातच लोकसभेच्या निवडणुकाही येत आहेत. त्यामुळे आता एकच गदारोळ सुरू होईल. सारे जीवन ढवळून निघेल.

वावटळ हळू हळू निघून संपून जाईल. आणि फाटलेली भित्तीपत्रके, रंगवलेल्या भिंती व रस्ते, पत्रकांचे कपटे, द्वेष, मत्सर, असूया, संताप हे सारे मागे ठेवून निवडणूक संपेल. □ □ □

# मराठवाड्याची हालहवाल

## देवदत्त तुंगार

### मध्यावधी निवडणुकीचा रागरंग

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी लोकसभेचे विसर्जन करून मध्यावधी निवडणुका घेण्याचा 'धाडसी' निर्णय घेऊन सर्वच विरोधी पक्षांची तारांबळ उडवून दिली आहे. मराठवाड्यातील पाचपैकी चार जिल्हे इंडिकेट काँग्रेसच्या दृष्टीने सुरक्षित आहेत. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत फक्त बीड जिल्ह्यातून 'पत्री-सरकार फेम' श्री. नाना पाटील हे एकमेव नेते लोकसभेवर विरोधी पक्षातून निवडून गेले. यावेळच्या निवडणुकीतही बीडखेरीज इतर सर्व काँग्रेसचेच उमेदवार लोकसभेवर निवडून जातील असा अंदाज आहे. पण यावेळच्या निवडणुका काँग्रेसला पूर्वीइतक्या सोप्या राहिलेल्या नाहीत, लढत चांगलीच रंगणार; कारण जनसंघ-संसोपा यांची या निवडणुकीत 'बडी आघाडी' निर्माण झाली आहे. माझे हे वार्तापत्र प्रसिद्ध होण्यापूर्वीच मराठवाड्यातील लोकसभेचे उमेदवार सर्व पक्षांनी निश्चित केल्याचे जाहीर होईल. पण नव-काँग्रेसचे उमेदवार निवडताना जो गोंधळ उडाला आहे तो बघण्यासारखा आहे. डॉ. रफिक झकेरिया व श्री. बाबूराव काळे या दोघांना नव-काँग्रेसचे तिकीट औरंगाबाद जिल्ह्यातून देण्यात आल्याचे जाहीर झाले. पण लगेच दुसरे दिवशी दोघांचीही 'उमेदवारी' रद्द करण्यात आल्याची बातमी झळकली. दोघांनीही लोकसभेसाठी उभे न राहण्याचा निर्णय घेतला असे सांगण्यात आले; तर काही वृत्तपत्रांनी 'मोठ्या साहेबांचा' झकेरिया यांच्यावर रोष असल्याने त्यांना तिकीट नाकारण्यात आल्याचे प्रसिद्ध केले आहे. डॉ. रफिक झकेरिया यांच्यासारखा मुस्लिम समाजातील बराचसा पुरोगामी माणूस लोकसभेवर व केंद्रीय मंत्रिमंडळात गेला असता तर बरे झाले असते असे अनेकांना वाटते.

नांदेड जिल्ह्यातून एकाच व्यक्तीचा अर्ज मान्यतेसाठीं पाठविण्यात आला आहे. ती व्यक्ती बहुधा विसर्जित लोकसभेचे सदस्य श्री. व्यंकटराव तरोडेकर (देशमुख) असावी. पण इतरांची नावेही चर्चिली गेली असे वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले आहे व या संदर्भात नांदेडचे नगराध्यक्ष श्री. रामनारायण काबरा यांचे नाव घेण्यात येते.

माझे मित्र व यशवंत कॉलेजचे प्राचार्य गो. रा. म्हैसेकर यांचेही नाव चर्चेत आले होते. पण श्री. म्हैसेकर यांना सक्रिय राजकारणापेक्षा शिक्षण व समाजसुधारणा यातच अधिक 'रस' आहे. म्हैसेकरांसारखा चतुरस्त्र आणि बुद्धिमान माणूस काँग्रेसला फारसा परवडणारा नाही. आमच्यासारख्या अनेक चहात्यांना मात्र त्यांनी लोकसभेत जावे असे वाटते. उस्मानाबाद जिल्ह्यात संसोपाचे काम डॉ. बापूसाहेब काळदाते यांच्यामुळे वाढले असून या निवडणुकीत संसोपा चांगली लढत देईल असे वाटते. त्यामुळेच काँग्रेसचे आतापर्यंतचे उस्मानाबाद जिल्ह्यातील खासदार श्री. तुळशीराम कांबळे व श्री. तुळशीराम पाटील या उमेदवारांना तिकिटे मिळतीलच याची शाश्वती नाही. काँग्रेस नव्या दमाच्या तरुणांना 'उमेदवारी' बहाल करण्याच्या विचारात असल्याचे सांगण्यात येते.

## डॉ. भालेराव यांचा बहुमान

डॉ. मोहन भालेराव हे नांदेडचे लोकप्रिय डॉक्टर आहेत. त्यांना अमेरिकेच्या इंटरनॅशनल कॉलेज ऑफ सर्जरीची फेलोशिप नुकतीच मिळाली. ही फेलोशिप मिळविणारे डॉ. मोहन भालेराव मराठवाड्यातील पहिलेच गृहस्थ आहेत. त्यांनी सादर केलेला प्रबंध अमेरिकेच्या रीसर्च इन्स्टिट्यूटने मान्य केला आहे. त्यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल नांदेडमध्ये त्यांचे अनेक संस्थांकडून अभिनंदन होत आहे.

## परभणीचा तमाशा मेळावा

खंडोबाच्या यात्रेच्या निमित्ताने परभणी येथे तमाशा कलावंतांचा मेळावा आयोजित करण्यात आला. तमाशेवाल्यांच्या अडीअडचणींचा याप्रसंगी विचार करण्यात आला. त्यांना परवाने देण्यात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, दीर्घ मुदतीचे परवाने द्यावेत इत्यादी मागण्या करण्यात आल्या. तमाशासंबंधी विशेष आस्था असणारे संसोपाचे एक कार्यकर्ते श्री. गंगाधर पटणे यांनी सदर मेळाव्यात आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, तमाशा कलेत शाश्वत मूल्ये आहेत. पुराणातील गोष्टी लोकांपर्यंत पोचविण्याचे काम तमाशामुळेच साध्य झाले आहे. नृत्य—गायनादीचा निर्भेळ आनंद लुटण्यासाठी जनतेचा तमाशासंबंधीचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे असेही त्यांनी प्रतिपादिले. तमाशाच्या कार्यक्रमाची 'उंची' वाढवावी असा उपदेश नामदार वामनराव नायक यांनी केला. नगराध्यक्ष श्री. अब्दुल रेहमानखां यांनी समारोप केला. सदर मेळाव्यात पास झालेल्या दहा ठरावांची सरकारने व संबंधितांनी दखल घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

## आंतरजातीय विवाहमंडळाचा प्रथम वार्षिकोत्सव

मराठवाड्यातील आम्ही काही आर्यसमाजी विचारांच्या लोकांनी हेतुपूर्वक आंतरजातीय विवाह स्वतः केले व इतरांचे घडवून आणले. प्रेमविवाह किंवा 'भानगडीतून' निर्माण झालेले विवाह म्हणजे आंतरजातीय विवाह. अशी अनेकांची कल्पना झालेली आहे व त्यात अनेकदा तथ्यही असते. पण आम्ही मात्र जातीयता-निर्मूलनाच्या उद्देशाने हेतुपूर्वक ( Arranged Inter-caste marriages) आंतर-जातीय विवाह करावेत असा प्रचार व आचार करणारे लोक आहोत. या कामास योजनापूर्वक वेग आणता आला तर पहावा या हेतूने बीड जिल्ह्यातील रेणापूर या गावी मागीलवर्षी आंतरजातीय विवाहमंडळ स्थापन करण्यात आले. वर्षभरात झालेली प्रगती फारशी समाधानकारक नाही. या मंडळाचा पहिला वार्षिकोत्सव १४ जानेवारीस रेणापूर येथे साजरा होत आहे. श्री. शेषरावजी वाघमारे व पंडित नरदेवजी लोही याप्रसंगी मार्गदर्शन करण्यास येणार आहेत. प्रा. हरिश्चंद्र रेणापूरकर व श्री. माणिकरावजी आर्य संयोजक आहेत. वार्षिकोत्सवाचा वृत्तांत पुढील वार्तापत्रात देईन.

## पत्रकारदिन उत्साहात साजरा

नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष व 'पंचनामा' साप्ताहिकाचे संपादक श्री. लक्ष्मणराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकारदिन ६ जानेवारीस साजरा झाला. याप्रसंगी मी जिल्हापत्रांच्या समस्यांसंबंधी प्रामुख्याने विश्लेषण केले. या निमित्ताने पत्रकार, साहित्यिक असतो काय व त्यास साहित्यिक म्हणून मान्यता द्यावी काय यासंबंधी चर्चा झाली. सर्वश्री आ. अत्रे, प्रभाकर पाध्ये, शिरीष पै, वि. स. वाळिंबे, विद्याधर गोखले, भा. द. खेर इत्यादींनी पत्रकार राहूनही साहित्य-क्षेत्रात लौकिक मिळवला आहे. पण केवळ पत्रकार म्हणून कार्य करणाऱ्यांनाही साहित्यिक मानण्यात यावे, कारण रंजक व बोधप्रधान साहित्याप्रमाणे प्रचारात्मक साहित्यासही विशेषतः आजच्या लोकशाहीच्या जमान्यात महत्त्वाचे स्थान आहे. पत्रकारांची भाषा सोपी व प्रवाही असते. 'शैली'ला साहित्यात मानाचे स्थान असते. व पत्रकार हे 'शैलीकार' असतात. यादृष्टीने पत्रकारांना साहित्यिक समजण्यात यावे असे याप्रसंगी प्रतिपादन करण्यात आले.

□ □ □

# आरोव्हिल

## पाँडिचरी

योगी श्री. अरविंदांच्या पाँडिचेरी येथील कर्मभूमीपासून सुमारे ८ किलोमीटर्स अंतरावर केंद्रशासित पाँडिचेरी आणि तामिळनाडू राज्य यांचा काही एकर भाग व्यापलेले आरोव्हिल. म्हणजे उमलत्या स्वप्ननगरीचा एक आविष्कार.

आंतरराष्ट्रीय संस्कृतिचा ठसा उमटावा, देशोदेशीचे स्त्री पुरुष-प्रगती, ऐक्य, विश्वबंधुत्व आणि शांती यांच्या कुशीत धर्म, जात, देश सारं काही विसरून खेळीमेळीने रहावेत म्हणून या आंतरराष्ट्रीय शहाराचे प्रयोजन.

२८ फेब्रुवारी १९६८ रोजी युनेस्कोचे सदस्य असलेल्या १२० देशातील एक मुलगा व एक मुलगी यांच्या जोडीने त्या त्या देशातील माती आरोव्हिल येथील मातीत मिसळली आणि येथेच विश्वबंधुत्वाचा प्रयोग करणाऱ्या आंतरराष्ट्रीय शहाराचा–आरोव्हिलचा पाया घातला गेला.

भारत सरकार आणि युनेस्को यांनी आरोव्हिलच्या स्थापनेसंबंधी पुढाकार घेतला. पाँडिचेरी आणि तामिळनाडू सरकारांनी सुमारे २० हजार एकर जमीन या प्रायोगिक आंतरराष्ट्रीय शहरासाठी दिली. त्यापैकी पहिल्या प्रकल्पासाठी ११ हजार एकर जमिनीचा वापर सध्या करण्यात येत आहे.

विजय वैद्य

आरोव्हिलचा आराखडा अशा प्रकारचा आहे की संपूर्ण शहर अस्तित्वात आल्यावर ते उमलेल्या कमळाप्रमाणे भासेल. एकूण ५० हजार लोकांची तेथे राहण्याची व्यवस्था येत्या २० वर्षात करायची आहे. त्यापैकी २० हजार लोक हिरवळीच्या पट्ट्यातील निसर्गरम्य व शांत अशा आदर्श खेड्यातून राहतील तर बाकी ३० हजार जागतिक व्यापार व व्यवसाय केंद्र व तत्सम इतर नव्या प्रकल्पानुसार तयार होणाऱ्या केंद्राजवळील वसाहतीत राहतील.

तळी आणि कारोमंडलचा समुद्रकिनारा यांच्या सानिध्याने या भागावर वैभवाची झाक दिसते.

सुरुवातीला निरनिराळ्या देशातील १२५ लोक आरोव्हिल येथे कामासाठी गेले व तेथेच कायमचे वास्तव्य करून स्वतःच्या कल्पना, कसब, यांचा मेळ घालून आगळ्या ढंगाच्या आरोव्हिलला आकार देण्यासाठी हे स्वप्न साकार करण्यासाठी तन, मन, धन देऊन राहिले.

अनेक वेळा लोक स्थायिक होण्याचा निर्णय घेऊन येतात. पण त्यांच्या देशात मिळणाऱ्या अनेक सुखांचा येथे कदाचित लाभ होणार नाही. किंवा हवामानाशी जुळवून घेता येणार नाही असे दिसताच परत जातात. मेरिलिन नावाची एक मध्यमवयीन अमेरिकन स्त्री अमेरिकेतील सर्व चीजवस्तू विकून स्वतःच्या मांजरीसहीत तेथे गेली आहे. ती मला म्हणाली की, हवा तसा बंगला न मिळाल्याने व हवामानामुळे ती आता परत जाण्याच्या विचारात आहे. पण अमेरिकेऐवजी भारतात किंवा युरोपात स्थायिक होण्याचा तिचा विचार आहे. तर कथक नावाचा एक तरुण तिबेटियन व अरोबिन्दम नावाचा एक अमेरिकन (तो युनेस्कोचा प्रतिनिधी म्हणून तेथे काम पाहतो. त्यांची बायको इंजिनियर आहे.) गेली पाच वर्षे (म्हणजे आरोव्हिलचा पायाभरणीसमारंभ होण्यापूर्वीपासूनच) तेथे मनापासून काम करीत आहेत. सौ. अरोबिंदम याही अतिशय उत्साही आहेत. कामात व्यग्र असूनही माहिती देण्याकरिता त्या पटकन पुढे आल्या. निरनिराळ्या १५ देशातील एकूण २०० लोक सध्या तेथे रहात आहेत. प्रकल्पाचे मुख्य आर्किटेक्ट आहेत फ्रान्सचे रॉजर ॲनगेर.

तेथे वास्तव्यासाठी जाण्यापूर्वी श्रीअरविन्दाश्रमाच्या माताजींना (मदर) व्यक्तीचा फोटो पाठवावा लागतो. त्यांनी तो फोटो पाहून मान्यता दिली तरच तेथे वास्तव्याकरिता जाता येते. पण अजूनपर्यंत तरी कोणालाही नकार मिळालेला नाही. पहिल्या वर्षभराची बेगमी होईल एवढे पैसे आणायची त्या व्यक्तीची तयारी असावी लागते. त्यानंतर ज्याला जे जमेल ते काम करून तेथे राहता येते, गुजराण करता येते. शेतकरी असेल तर जमीन मिळते. पूर्वी कोठे अधिकारावर असणाऱ्याला व्यवस्थापनेत सामावून घेण्यात येते. आतून अत्यंत आधुनिक असणाऱ्या पण गवताच्या निरनिराळ्या आकाराच्या झोपड्या तेथे बांधण्यात आल्या

आहेत. त्यांचे बाह्यांग व अंतरंगही कोणालाही आकर्षित करून घेण्यासारखेच आहे. तेथे गेल्यावर परत येऊसं वाटतच नाही. स्थापत्यशास्त्रज्ञ, वास्तूतज्ञ, शिल्पकार तेथे जातात आणि आपापल्या कल्पनांना वाव देऊन त्या स्वप्ननगरीच्या सौंदर्यात भर टाकतात. फुलं व फळझाडे यांची तेथे जोपासना केली जाते व घरांभोवतीही हिरवंगार गवत आणि बागबगीचे यांनी आधीच रम्य असणारं आरोव्हिल अधिक रंगतदार करण्याचा प्रयत्न केला जातो. झोपड्यांवरील गवत हिवाळा, पावसाळा वा उन्हाळ्यापासून राहणाऱ्यांचे योग्य त्या प्रकारे रक्षण करून आवश्यक ते तपमान ठेवण्याच्या दृष्टीने वापरलेले आहे.

अनेक वेळा राहणारे लोक एकीकडून दुसरीकडे जागा बदलत असतात. तरुण मंडळींचे नवे नवे प्रयोग चालू असतात. तर म्हातारी मंडळी त्यामानाने संथ जीवन पसंत करतात.

तिबेटी संस्कृतीचे जतन करण्याच्या दृष्टीने साहित्य, धर्म, कलाकुसर, पुस्तके हस्तलिखिते यांचे दर्शन घडविणारा तिबेटियन मंडपही उभारला जात आहे. आपापल्या योग्यतेनुसार काम करायला मिळावे म्हणून हातमाग व इतरही व्यवसायांचे छोटे छोटे कारखाने उभारण्यात येऊ लागले आहेत. युनेस्को व इतर देशांकडून आवश्यक ती मदत तेथे जाते. पण श्री. अरोबिन्दम यांच्या प्रांजळ शब्दात सांगायचे तर अजूनही अपेक्षित यश आलेले नाही.

आरोव्हिल येथे कोणी बेकार असणार नाही. कोणी भीक मागणार नाही. कमीत कमी कायदेकानून यावर भर दिला जाऊन प्रत्येकाने मिळणाऱ्या स्वातंत्र्यात आपल्याला शिस्त लावून घेऊन विश्वबंधुत्वाचे स्वप्न साकार करायचे आहे. प्रत्येक देशाचा व भारतातील प्रत्येक राज्याचा एक एक सांस्कृतिक मंडप (पॅव्हेलियन) तेथे असेल व त्या त्या देशांची व प्रांतांची तेथे वैशिष्ठ्ये असतील. आगळ्या प्रकारचे व कदाचित जगातील पहिल्या प्रकारचे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ तेथे असेल. समुद्रकिनाऱ्यांचा कल्पकतेने वापर करून तेथे प्रवाशांना आकर्षण वाटेल अशी सोय केली जाईल. जगातील सर्व खेळांचं तेथे शिक्षण दिले जाईल. निरनिराळे जागतिक परिसंवाद व परिषदांचे ठिकाण म्हणूनही त्या शहराचा वापर केला जाईल. कलावंतांनाही आरोव्हिल स्वर्गाप्रमाणे भासेल.

लहान मुलांना नेहमी स्वप्ने पडतात. ती असतात परिकथेतील स्वप्ननगरींची. असेच कोणाला तरी स्वप्न पडले आणि 'आरोव्हिल'–'सिटी ऑफ डॉन'च्या निर्मितीला श्री. अरविन्दांच्या स्मृतीगंधाने सुगंधित झालेल्या जागेवर सुरुवात झाली आहे. जपानमध्येही असाच प्रयोग करण्याचा संकल्प केला गेला आहे. आरोव्हिलच्या यशापयशावर अशी विश्वबंधुत्वाची हाक देणारी शहरे उभारली जाणार आहेत.

□ □ □



# हिंदोळा

अशोक साळवी

कॉलेजची एक एक पायरी तो उतरत असतो. समोर तेच सोनचाफ्याचं झाड. तशीच फुलझाडं. हळुवार झुळुके-बरोबर गळून पडणारी पानं. एरवी असं दृष्य पाहून खुलून जाणारा तो. परंतु आज सगळी घडीच विस्कटलेली. स्वतःच्या मूर्खपणाची, झालेल्या अप-मानाची मनात लागून राहिलेली टोचणी. अंतरीतला काळोखच जणू बाहेरच्या सृष्टीवर पसरलेला.

पडणाऱ्या एकेका पानागणिक अनेक आठवणींचं भेंडोळं मनात उलगडत असतं. त्याला वाटत असतं, त्या पानासारख्याच या आठवणी पण कायमच्या नष्ट व्हाव्यात !

अन चालता चालता अचानक त्याचे पाय थबकतात. पावलं जड पडायला लागतात. तरीसुद्धा तो तसाच नेटानं चालत रहातो.

समोरून ती येत असते !

शरयू,

त्याची शरू !

त्याच्या आवडीच्या साडीत. फिकट निळसर रंगाच्या. तसलाच मॅचिंगचा ब्लाऊज अन् हातात छोटीशी डौलदार पर्स.

तो चक्रावतो.

का आलीय ती पुन्हा इथं ? एकदा हृदयाच्या ठिकऱ्या केल्यावरही हिचं समाधान झालं नाही ? कशाला डिवचतेय ही आपल्याला ?

समोरून ती येतच राहते. हळुवार मंद पावलं टाकीत. मान खाली घालून. नेहमीची चालण्यातली लय कुठल्या कुठे लुप्त झालेली असते.

हळूच येऊन ती त्याच्यासमोर उभी राहते. त्याच्या मनात मात्र हजारो प्रश्नचिन्हांनी काहूर माजविलेलं असतं. ती त्याच्याचकडे आलेली असते हे निश्चित !

पण का ?

दादांचा विरोध मोडून तर आली नाही ना ? पण ते तर तिनं अगोदरच स्पष्ट केलेलं असतं. दादांच्या आज्ञेबाहेर ती जाणार नाही म्हणून. मग त्याचवेळी धागे तुटले नव्हते का ? आपल्या प्रेम-संबंधांची त्याचवेळी तर होळी झाली.

मग अजून काय राहिलंय तिचं ?

का आलीय ती ?

का ? का ?...का ?...

आपण भेलकांडून पडू असं त्याला वाटतं. पाय ओढून आपल्याला कोणीतरी खेचतंय असं त्याला वाटायला लागतं. शरीरातला स्नायून् स्नायू ढीला पडल्याची जाणीव त्याला होते.

“ मुद्दाम आले मी आज ! ”

तीच स्वतः निःस्तब्धतेची कोंडी फोडते. त्याच्या विचारचक्राला थोडीतरी खीळ बसते.

पण तो काहीच बोलत नाही.

तिच्या डोळ्यातल्या निस्तेज बाहुल्यांकडं तो नुसताच पहात राहतो.

याच दोन बाहुल्यांचा खेळ पाहताना प्रत्येक भेटीत किती रंगून जायचा तो !

तिलाही वाईट वाटतंय या सर्वांचं ?

त्याच्यापुढे आणखी एका प्रश्नाची भर.

“ कॉफी घेऊया प्रदीप. ”

तीच म्हणते. त्याच निर्विकारपणे. चेहऱ्यावरची रेषाही न बदलता.

तो खरं तर आतल्या आत भडकून उठतो. नाही म्हणून ओरडून सांगावसं त्याला खूप वाटतं. गदगदा हलवून तिला जाब विचारावा असंही त्याला खूप वाटतं. तुझ्या दादांना नसलो तरी तुला पसंत होतो की नाही ? असं जोरजोरात

ओरडन विचारावंसं वाटतं त्याला.

पण यापैकी काहीच करत नाही तो !

कारण ती अगोदरच चालायला लागलेली असते. तो भारावल्यासारखा तिच्या पाठोपाठ कॅन्टीनमध्ये येऊन बसतो.

कॉलेजचं कॅन्टीन. साडेपाचची वेळ. म्हणजे नेहमीचीच त्यांची लायब्ररीतून यावेळी चहा प्यायला बाहेर यायची. कॅन्टीनमध्ये गर्दीही कमी असायची यावेळी.

अभावितपणे बरोबर ती त्याच जागेवर जाऊन बसलेली असते. खिडकीजवळचं कोपऱ्यातलं टेबल. पंख्याखालचं. बसलेली असते ती पण नेहमी सारखीच खिडकी-कडे तोंड करून !

पुन्हा तीच स्तब्धता.

" मुद्दाम आले आज, म्हटलं तू उद्या-परवा जाणार असशील. "

उदासीनतेला झटकून तिचे शब्द कसे तरी बाहेर आल्यासारखे वाटतात.

तो मात्र अजून तसाच गोंधळून, आकसून बसलेला. यापूर्वीच्या नेहमीच्या भेटीच्या वेळची तिची बडबड आठवणारा. तिच्या निस्तेज डोळ्यात पूर्वीच्याच बाहुल्यांचा खेळ आठवून पाहणारा !

" म्हटलं शेवटची कॉफी तरी घ्यावी तुझ्याबरोबर. "

पुन्हा एकदा तिनं त्याला जागं केलेलं असतं.

पण त्याला असलं मिळमिळीत बोलणं नको असतं. शरीर झटकून या मानसिक कोंडीतून फुटावं, बाहेर पडावं असं त्याला सारखं वाटत असतं. तिच्या डोळ्यात तो बाहुल्यांचा खेळ सुरू व्हावा असं त्याला पुन्हा पुन्हा वाटत असतं.

पण तिच्यावर त्याचा अधिकारच कुठं राहिलेला असतो? आता चांगल्या मार्कांनी पास झाल्याच्या आनंदावर कालच तर तिच्या वडिलांनी पाणी ओतलेलं असतं. शेवटची परीक्षा पास झाल्यावरची त्याची स्वप्नं मातीत मिसळलेली असतात...

नोकरी.

शरू.

तो परस्पर सहवासाचा हिंदोळा !

दोरच कापले गेलेले असतात त्या हिंदोळ्याचे !

या सर्वांचा तू अगोदरच का विचार केला नाहीस शरू ?

" पुढच्या आयुष्यात सुद्धा तू कविता करायचा छंद जपणार असशील ना प्रदीप ?"

कविता ?

या कवितेनंच तर ही स्वप्नं दाखवली ! कॉलेजच्या नियतकालिकेतील कविते-बद्दल अभिनंदन करायला आली होतीस तो प्रसंग मी विसरणार आहे थोडाच शरू ? त्यानंतर तुझ्या सानिध्यातच तर माझी कविता फुलली ना ? अग त्या प्रत्येक कवितेशी तुझ्या आठवणी निगडीत आहेत.

...नेहमीच्या सवयीनं वेटरनं कॉफी केव्हाच आणून ठेवलेली असते टेबलावर. थंड कॉफीचे घुटके ती निर्विकारपणे घेत असते.

त्याला वाटतं झाल्या प्रकाराबद्दल माफी मागण्यापेक्षा तिनं दादांशी बंडखोरी करावी. त्याला वाटतं द्यावी तिला तिच्या वचनाची आठवण करून. विरोधातून जीवन फुलविण्याची कल्पना सांगावी वाटतं त्याला.

पण तो गप्प बसतो.

तिनं होऊनच ते का करू नये ?

तिच्याजवळ याचना कशासाठी ?

त्याच्या डोक्यात काहूर माजलेलं असतं. संतापानं शब्दांची ओठातल्या ओठातच राख होत असते !

फार वेळ बसलो तर राग अनावर होईलसं वाटतं त्याला.

जायला हवं पटकन इथून.

तो ताडकन खुर्ची मागं सरकवतो. क्षणभर रेंगाळतो. जाताना तरी काही सुनवावं असं त्याला वाटत असतं.

पण, " जातो मी " एवढेच शब्द ओठातून कसेबसे निसटू शकतात !

भराभर पावलं टाकीत तो कॅन्टीनमधून बाहेर पडतो. पायऱ्या उतरताना पुन्हा तेच दृश्य. तेच सोनचाफ्याचं आकाशाला छेद देत उभं असलेलं झाड. तीच फुलझाडं. तोच सायंकाळचा निःस्तब्ध परिसर.

याचवेळी ती पहिल्यांदा भेटली होती !

अभिनंदन करायला आली होती.

वळून पहायचा अनिवार मोह तो टाळू शकत नाही. नजर हळूच तिरपी होते.

वीसच पावलांवर ती मागोमाग येत असते !

त्याला उगाचच मेल्यासारखं होतं. स्वाभिमान दुखावला गेल्याची तीव्र जाणीव होते. पुन्हा एकवार नेटानं तो पावलं उचलतो...

अन् मिस्किल हसण्याच्या ध्वनीनं तो तिथल्या तिथंच खिळून जातो.

नक्की तीच हसत असते !

हसत हसत पुढंही सरकत असते. नेहमीसारखी पर्स फिरवीत.

ती जवळ येऊन उभी रहाते.

मिस्किल ओठासमवेत त्याच त्या बाहुल्या.

जादूच्या.

नाचणाऱ्या !

डोळ्यात पाणीही तरारल्यासारखं वाटतं त्याला तिच्या.

विजेसारखा तो पुढं सरकतो. हातांनी केव्हाच एकमेकांच्या हातांना प्रतिसाद दिलेला असतो !

तिचे लाडिक ओठ हळूच पुटपुटतात,

" सगळं खरं वाटलं तुला हे प्रदीप ?"

◻ ◻ ◻



# पर्ल हार्बर

विनय कुबेर

लेखांक : पाच

हकीगतीच्या प्रारंभी वर्णिल्याप्रमाणे दोन लांब पल्ल्याची सागरी निमाने टेहेळणी-साठी पुढे रवाना झाली. हा सलामीचा बाण होता. हे छुपे डोळे ओहू व माई बेटांजवळील जहाजे नांगरण्याच्या जागेवरून घिरट्या घालून अमेरिकन आरमाराची अखेरची तपासणी करणार होते. ही विमाने सापडली असती तर या पराक्रमी कुंभकर्णाची झोप उडाली असती. परंतु शत्रूच्या तयारीबद्दल अंतिम क्षणी अद्ययावत् माहिती मिळविण्या

साठी अशा प्रकारे विस्तवाशी खेळ करणे भागच होते.

सर्व वैमानिकांना पहाटे तीन वाजण्यापूर्वीच झोपेतून उठविण्यात आले. घरी निरोपाची पत्रे लिहिण्यात व डायरीत अखेरचे निवेदन लिहिण्यात व टिपणे करण्यात बहुतेकांनी झोपण्यापूर्वीचा बराच वेळ घालविला होता. त्यामुळे त्यांच्या डोळ्यांवरील झोप उडेना.

न्याहरीनंतर सर्वजण शेवटच्या स्फूर्तिप्रद भाषणासाठी एकत्र जमले. या गंभीर व तंग वातावरणात 'हिर्यू'वरील टारपेडोफेक्या वैमानिक लेफ्टनंट मात्सुमारा याने हास्यविनोदाची धमाल उडवून दिली. हिटोकपू आखात सोडल्यापासून त्याने तोंडावर कापडी आवरण (ऑपरेशनचे वेळी डॉक्ट वापरतात तसे) वापरले ह ते. ते तो जेवण घेतानाही सोडत नसे. त्याखालूनच अन्न तोंडात ढकली. निर्णायक क्षणी सर्दीने हैराण होऊन हल्ल्यात भाग घेण्याची संधी हुकू नये म्हणून ही काळजी घेत असल्याचे तो सांगत असे.

आज सकाळी त्याने हे आवरण काढून फेकून दिले. गुप्तपणे वाढविलेल्या रुबाबदार काळ्याभोर मिशांवर पीळ देत तो हिंडत होता. जपानी आरमारात दाढीमिशा अजिबात सफाचट करण्याची प्रथा आहे. त्यामुळे मात्सुमाराच्या या 'नव्या दागिन्या'वर विनोदी कोटया होत होत्या. त्याचे सहकारी त्याला म्हणाले, 'खरे म्हणजे तू त्या मुखवटयातच सुंदर दिसू लागला होतास !'

आरमार ओहूपासून दोनशे मैलांवर येऊन ठेपले ! विमानांना जहाजांवरून उड्डाण करताना पाठमोरा वारा हवा होता. म्हणून सर्व सहा विमानवाहक जहाजांनी त्यांची तोंडे पूर्वेकडे वळविली व वेग ताशी २४ नॉटपर्यंत वाढविला.

सागरात खळबळ माजली होती. प्रचंड आकाराच्या लाटा जहाजांवर आपटून फुटत होत्या. विमानांच्या उड्डाणमार्गावर तुषारांचा वर्षाव होत होता. त्यामुळे विमानांना उड्डाण करणे अवघड झाले. प्रत्येक विमानवाहक नौकेवर युद्धदर्शक निशाण उभारण्यात आले.

हल्ल्याच्या पहिल्या फेरीतील 'विक्राळ गरुडां'च्या (Wild Eagles-जपानी विमानाचे नाव) उड्डाणासाठी उत्साही खलाशांनी सर्व उड्डाणमार्ग मोकळे केले.

वैमानिक व त्यांचे विमानातील मदतनीस विमानात चढण्यास सज्ज झाले. त्यांनी त्यांच्या चामडी मुखवटयांवर 'हाचिमाकी' नावाचे रुमाल बांधले. रजपूत लोक रणांगणात उडी घेताना जसे केशरी पोशाख परिधान करतात तसेच जपानी योद्धे पूर्वीपासून 'हाचिमाकी' नावाचे लांबलचक निमुळते रुमाल डोक्याला गुंडाळून रणांगणावर जातात. त्यावर लिहिलेले असते 'हिश्शो' (निश्चित विजय !)

सर्व विमानांनी जहाजावरून सुरळीतपणे व जलद उड्डाण केले. पहिल्या फेरीत

४३ लढाऊ विमाने, ४९ बाँबस, ५१ सूरमारी बाँबर्स व ४०] टारपेडोफेक्या विमानांचा समावेश होता. फक्त १५ मिनिटांच्या अवधीत सर्वच्या सर्व १८३ विमाने आकाशात चढली ! जलद उड्डाणाचा हा उच्चांक ठरला ! कियुशू येथील सरावाचे वेळी चांगल्या हवेतही या कारवाईस ४० मिनिटे लागत. पुढे आरमार हिटोकपू आखाताकडे जाण्यास निघाले तेव्हा हा काल २० मिनिटापर्यंत कमी झाला ! प्रत्यक्ष हल्ल्याच्या वेळी तो त्यापेक्षाही कमी झाला. अपघात फक्त दोनच घडले. एका लढाऊ विमान "हिर्यू 'वरून सागरात कोसळून नष्ट झाले !

फुशिडाने त्याचे पथक सर्वांत शेवटी व्यवस्थित जुळवून सर्वांना इशारा दिला. सर्व विमानांनी ताफ्यातील आपापल्या जागा घेतल्या. १८३ विमानांच्या या प्रचंड थव्याने पर्ल हार्बरकडे झेप घेतली. ताबडतोब जहाजांवरील सर्व खलाशांनी राहिलेली सर्व विमाने (दुसऱ्या फेरीतील) उड्डाणास सज्ज करण्यास प्रारंभ केला. या दुसऱ्या फेरीसकट हल्ल्यासाठी एकूण ३५३ विमाने वापरण्यात येत होती. सागरी युद्धाच्या इतिहासात इतक्या प्रचंड संख्येने विमानांचा उपयोग होण्याची ही पहिलीच वेळ !

जपानी राष्ट्राच्या 'उगवत्या सूर्या'च्या चिन्हाला अपूर्व तेज चढले होते. जहाजावरील खलाशी विमानांचे ठिपके बनेपर्यंत त्यांना टोप्या हलवून निरोप देत राहिले. त्यांच्या डोळयातून आनंदाश्रू वहात होते ! डेकवर उभ्या असलेल्या जेंडाला अभिमानाचे भरते आले होते ! काही वेळाने तो जहाजाच्या कंट्रोल-रुममध्ये गेला. फुशिडा पर्ल हार्बरवर पोचल्यावर काही महत्त्वाचा संदेश पाठविणार होता. त्याची जेंडा आतुरतेने वाट पाहू लागला. त्याच्या कानात वैमानिकांचे निरोपाचे शब्द (बांझाई ! बांझाई !!) बराच काळ घुमत राहिले.

प्रशांत महासागरात पसरलेली इतर चार जपानी नौदलेही या महत्त्वपूर्ण संदेशाची उत्सुकतेने वाट पहात होती. हा संदेश मिळताच ती इतरत्र जवळ जवळ १०-१२ आघाड्यांवर युद्ध सुरू करण्यास सज्ज झालेली होती. दूर मायदेशी यामामोटो सेनापती मंडळाच्या सभासदांसह गंभीरपणे याच संदेशाची प्रतीक्षा करीत होता.

पूर्वी सोडलेल्या दोन टेहेळणी विमानांनी पर्ल हार्बरमधील अद्ययावत् परिस्थितीची माहिती दिलेली होतीच. अमेरिकन आरमार बंदरातच होते. ते सावध असल्याचे पुसट चिन्हही आढळत नव्हते !

बरोबर ७-४९ ला फुशिडाने हवाईच्या नभांगणातून पाठविलेल्या संदेशाने हवेच्या लाटा कडाडल्या ! 'तो ! तो ! तो !'

'हल्ला करा' या अर्थाच्या जपानी शब्दांचे हे अद्याक्षर होते. परंतु त्यावरून हल्ल्याच्या प्रसंगी रणांगणावर काय परिस्थिती होती, याचा बोध होत नव्हता !

आणखी काही मिनिटांनंतर टोकियोत व अकागीवर कानात प्राण आणून बसलेल्या वरिष्ठांना फुशिडाने खात्रीचा संदेश दिला. 'तोरा! तोरा!! तोरा!!!'

'अमेरिकन आरमार पूर्ण बेसावध असता त्याच्यावर अचानक हल्ला करण्यात येत आहे' असे जाहीर करणारा तो पूर्वनियोजित गुप्त शब्द होता! ◻

हवाईमधील ७ डिसेंबरची प्रभात अलौकिक सृष्टिसौंदर्याने नटली होती. मुलायम बारीक वाळूच्या किनाऱ्याने वेढलेल्या ओहू बेटाला कोवळी सोनेरी सूर्यकिरणे गदगुल्या करीत होती. किनाऱ्यावरील नारळी व पाम वृक्षांची विरळ वने वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर डोलत होती. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. आवाज येत होता फक्त सळसळणाऱ्या पानांचा आणि खडकावर आपटून फुटणाऱ्या लाटांचा! हवाईला भूलोकावरील नंदनवनाचे स्वरूप आले होते! झोपेतून एकाएकी जागे झालेल्याला आपण स्वर्गातच आहोत असा भास झाला असता.

आदल्या दिवशी आठवडाअखेर असल्यामुळे लष्करी वसाहतीत करमणुकीचे सार्वजनिक समारंभ झाले. रविवारी सकाळी उशीरापर्यंत मनसोक्त साखरझोप घेण्याचा सर्वांचाच रिवाज होता. अमेरिकेचे जपानबरोबरचे संबंध बिघडत चालले होते. तरीसुद्धा जगात इतरत्र पेटलेल्या युद्धाच्या वणव्याची झळ अजूनपर्यंत हवाईला लागली नव्हती. प्रशांत महासागरातील या स्वर्गतुल्य भूमीवर अद्यापही वसंताचे लयबद्ध स्पंदन सुरू होते. अमेरिकन पायदल व विमानदलाचे हवाईमधील बहुतेक अधिकारी हा स्वर्गीय आनंद लुटत उशीरापर्यंत अंथरुणात लोळत होते!

आरमाराचा उत्साही व कर्तव्यदक्ष प्रमुख अॅडमिरल किमेल मात्र भल्या पहाटेच उठला होता. अत्यंत संयमी, कार्यक्षम व आरमाराशी तादात्म्य पावून काम करणारा अधिकारी अशी त्याची ख्याती होती. दिवसाचा जास्तीत जास्त वेळ तो आरमाराची व्यवस्था लावणे व जहाजांची युद्ध-सज्जता वाढविणे यासाठी खर्च करीत असे.

गेल्या आठवड्यात त्याच्यावर कामाचा फार ताण पडला होता. आठवडाअखेर आरमार बंदरातच ठेवायचे की उघड्या समुद्रात पाठवायचे याबद्दल शनिवारी दीर्घकाल विचारविनिमय झाला. अॅडमिरल किमेलला रविवारी विश्रांती व मनोरंजनाची नितांत आवश्यकता भासत होती. त्यामुळे सकाळचा वेळ हवाईतील पायदलप्रमुख लेफ्टनंट जनरल शॉर्ट याचेबरोबर गोल्फ खेळून घालवायचा कार्यक्रम त्याने निश्चित केलेला होता.

नोव्हेंबरच्या अखेरीस किमेलला युद्धाच्या धोक्याची सूचना वॉशिंग्टनहून मिळालेली होती. त्यामुळे त्याने आरमाराचा बराच मोठा भाग उघड्या समुद्रात रवाना केला होता. विमानवाहू नौका 'एंटरप्राईझ', तीन अवजड क्रूझर्स व नऊ विनाशिकांसह वेक बेटावर विमाने व इतर युद्धसामुग्री पोचविण्यासाठी पाठविली होती.

'लेक्सिंग्टन' ही विमानवाहू नौका, तीन अवजड क्रूझर्स व पाच विनाशिका असा आणखी एक ताफा मिडवे येथील नाविक तळाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी तिकडे गेला होता. आणखी एक तिसरे दल जमिनीवर उतरून लढाई करण्याच्या सरावासाठी जॉन्सन बेटांकडे गेले होते. 'सराटोगा' ही तिसरी विमानवाहू नौका दुरुस्ती-नंतर नुकतीच अमेरिकेतील तळ सोडीत होती.

अशा प्रकारे प्रशांत महासागरात नेमलेल्या अमेरिकन नौदलातील तिन्ही विमानवाहक नौका पर्ल हार्बरमधून गैरहजर होत्या. या प्रचंड नाविक तळावरील शिलकी आरमारास सागरी विमानांच्या संरक्षक छत्राविना उघड्या समुद्रात धाडण्यात फार धोका होता. ते बंदरातच ठेवल्यास त्याला निदान स्थानिक विमानदलाचे हवाई संरक्षण तरी उपलब्ध राहिले असते. म्हणून विचारान्ती सर्व जहाजे बंदरातच ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

शनिवारी रात्री ॲडमिरल किमेल एका खाजगी भोजनसमारंभास उपस्थित राहिला. त्याचे नौदलातील अनेक सहकारीही तेथे आले होते. किमेलने या जुन्या मित्रमंडळीत गप्पागोष्टी व मद्यपान करीत आनंदात वेळ घालविला. परंतु इतरांप्रमाणे मध्यरात्रीपर्यंत पत्ते खेळण्यास मात्र तो थांबला नाही. ९-३० चे सुमारास त्याने सर्वांची रजा घेतली व अर्ध्या-पाऊण तासातच तो निद्राधीन झाला.

पूर्व योजनेप्रमाणे सकाळी गोल्फ खेळणे त्याच्या नशिबी नव्हते. साडेसातचे सुमारास घराबाहेर पडण्याच्या तयारीत असता त्याचा फोन खणखणला. हेड्क्वार्टरमधील पहारापथकाचा मुख्य अधिकारी कमांडर मर्फी फोनवर बोलत होता. विनाशिका 'वार्ड'ला पर्ल बंदराच्या परिसरात एक पाणबुडी घोटाळत असल्याचा संशय आला होता. अशा प्रसंगी ती शत्रूचीच समजून तिला प्रतिकार करण्याचा व या प्रकाराबद्दल ताबडतोब स्वतःला माहिती देण्याचा हुकूम ॲडमिरल किमेलने देऊन ठेवला होता. आता या अज्ञात पाणबुडीचा पुरता छडा लावण्यासाठी त्याला ताबडतोब ऑफिसमध्ये हजर होणे आवश्यक होते.

लागलीच त्याने ऑफिसकडे जाण्यासाठी मोटार बाहेर काढण्याचा हुकूम दिला. तिची वाट पहात असता पुन्हा फोनची घंटा वाजली. मर्फीने सांगितले 'वॉर्डला पाण्यातील प्रतिबंधित भागात छोटी मासेमारी बोट आढळली आहे. किनारा संरक्षक दल तिला तेथून हुसकून लावीत आहे.' मर्फी बोलत असता हेड्क्वार्टरमध्ये एक स्थानिक शेतकरी घुसला. तो जोरजोराने ओरडत होता, 'जपानी विमाने पर्ल हार्बरवर हल्ला करीत आहेत!' मर्फीला ते खोटे वाटले. तरीही त्याने ही बातमी फोनवरून किमेलच्या कानी घातली. या भयंकर वार्तेने किमेल अंतर्बाह्य हादरला! हातातील फोन खाली आदळून तो तीरासारखा घराबाहेरील बागेकडे धावला!

त्याचे घर उंच भागी होते. त्यामुळे त्याला मोठमोठ्या वटवाघळांसारखी भासणारी अनेक जपानी विमाने पर्ल बंदरावर झेपावताना स्पष्ट दिसली. किंकर्तव्य-

मूढ होऊन तो ते दृष्य पहात राहिला. त्याच्या डोळ्यापुढे काजवे चमकले! हेड्क्वार्टरकडे जाण्यासाठी मोटारीची वाट पहात तो तेथे फक्त दोनच मिनिट उभा राहिला. पण ही दोनच मिनिटे त्याला दोन युगांसारखी भासली. तेवढ्यात त्याने युद्धनौकांच्या जुनाट युद्धतंत्राच्या युगाच्या चिता धडाडून पेटताना पाहिल्या आणि सागरी विमानसामर्थ्याच्या युगाची प्रभातही पाहिली! जपानी हल्ल्याने हवाईच्या नंदनवनातील शांतता संपुष्टात येऊन किमेलच्या निष्कलंक कारकीर्दीवर पाणी पडले होते!

वेगाने येणारी मोकळी मोटार ब्रेकचा कर्कश्श आवाज करून किमेलशेजारी थांबली. तो भानावर आला आणि घाईघाईने आत बसला. मोटारीने तावडतोब वेग घेतला. तितक्यात एका पाणबुडीप्रमुखाने आत उडी घेतली. लष्करी सलाम ठोकून परवानगी मागण्याची वेळ नव्हती ती! आठ वाजल्यानंतर किमेल ऑफीस-मध्ये पोचला.

या वेळेपर्यंत युद्धाने उग्र स्वरूप धारण केले होते. टारपेडोफेकी जपानी विमाने पर्ल बंदरातील इमारतींच्या छपरांना चाटून जहाजांकडे सूर मारीत होती. त्यांनी फेकलेले विध्वंसक टारपेडो किमेलच्या मौल्यवान जहाजांच्या काळजात घुसत होते. सूरमारी बाँबर विमाने क्रूर गरूडांप्रमाणे हिकेम विमानतळावर तुटून पडली. उंचावरून जाणारी बाँबर विमाने भयंकर संहारक रॉकेटस्चा वर्षाव करू लागली. या माऱ्यातूनही वाचणाऱ्या वस्तूंवर लढाऊ विमाने तुफान गोळीबार करीत घोंगावू लागली! बाँबस्फोटांचे धडाके, गोळ्यांचा सू सू आवाज, हल्लेखोर विमानांची घरघर, सावध होऊन प्रतिकार करणाऱ्या अमेरिकनांचा जोरदार गोळीबार यामुळे वातावरण घुसळून निघत होते! आगीतून उसळणाऱ्या तिखट धुराने डोळे चुरचुरु लागले. एक तासापूर्वी नंदनवन भासणारे पर्ल हार्बर आता नरकासारखे भासू लागले!

जपानी हल्ल्याची आकस्मिकता व संहारशक्ति यामुळे अमेरिकन सैन्य भांबावून गेले! ऑफिसकडे धावत असता किमेल त्याच्या कोसळत्या मन:स्थितीला सावर-ण्याचा शर्थीचा प्रयत्न करीत होता. त्याच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हते!

फोर्ड बेटावरील सागरी विमानदलाचा कमांडर रॅम्से याने हल्ल्याची वार्ता सर्व-प्रथम जगात प्रसृत केली. एका वैमानिकाला पाणबुडी दिसल्याची बातमी समजल्या-मुळे तो घाईने ऑफिसमध्ये गेला. टेहेळणी विमानांना या पाणबुडीचा शोध घेण्याची आज्ञा देण्यापूर्वी तो या बातमीची सत्यासत्यता पडताळून पहात होता. तोच त्याला विमानाची जोराची घरघर ऐकू आली. आपल्याच दलातील विमान अगदी कमी उंचीवरून उडत आहे या समजुतीने तो भयंकर क्षुब्ध झाला. कारण अगदी कमी उंचीवरून विमानोड्डाण करून त्या वैमानिकाने कमीत कमी सोळा सुरक्षा–नियमांचे उल्लंघन केलेले होते. रॅम्सेने हाताखालील अधिकारी बेलिंजर याला त्या विमा-

नाचा नंबर पाहून ताबडतोब त्याच्या वैमानिकाला स्वतःपुढे उभे करण्याचा हुकूम दिला.

विमान अगदी खाली आले तेव्हा दोघेही खिडकीतून बाहेर डोकावले.

'तुला त्याचा नंबर दिसला काय?' रॅम्सेने विचारले.

लेफ्टनंट बेलिजरने नकारार्थी मान हलविली. 'ते विमान स्क्वाड्रन कमांडरचे असावे असे मला वाटते. त्यावर लाल पट्टे रंगविलेले होते.' त्याने पुढे सांगितले.

एका स्क्वाड्रन कमांडरने असा बेजबाबदारपणा करणे ही गोष्ट अक्षम्य होती. त्यामुळे रॅम्सेने कठोरपणे विचारले 'कोण कोण स्क्वाड्रन कमांडर उड्डाण करीत आहेत?'

'मी त्या विमानातून एक काळी विचित्र वस्तू खाली पडताना पाहिली.'

बेलिजरचे हे वाक्य पुरे होते न होते तोच विमानगृहाच्या बाजूकडून स्फोटाचा आवाज उठला. एखादे गहन कोडे सुटल्याप्रमाणे रॅम्सेचा चेहरा उजळला. तो पिसाटासारखा ओरडला, 'ते विमान जपानी असले पाहिजे. त्याने टाकलेल्या बाँबचा उशिरा स्फोट झाला!' घाईघाईने तो कामावरील रेडिओ ऑपरेटरकडे धावला. साध्यासुध्या इंग्लिशमध्ये एक संदेश खरडून तो प्रक्षेपित करण्याचा हुकूम त्याने सोडला, 'ही सरावाची लढाई नव्हे. खरोखरीच पर्ल हार्बरवर विमान हल्ला होत आहे.' [ Air raid Pearl-Harbour. This is no drill! ]

अशा तऱ्हेने इतिहासात अत्यंत महत्त्वाचा ठरलेला हा संदेश हवेच्या लाटांवर आरूढ झाला. अॅडमिरल किमेलच्या हेडक्वार्टरनेही असाच संदेश रेडिओवरून प्रक्षेपित केला. परंतु फोर्ड बेटावरील रेडिओ त्याअगोदरच सुरू झाला होता. त्यामुळे अमेरिकेला दीर्घ कुंभकर्णी झोपेतून उठविण्याचे श्रेय कमांडर रॅम्सेला मिळाले!

अमेरिकन सागरी विमानदलाचा युद्ध योजनाधिकारी चार्लस् को हल्ल्याच्या प्रसंगी अंथरुणातून बाहेरही पडलेला नव्हता. प्रत्येक रविवारी तो सर्व कुटुंबाच्या न्याहरीची व्यवस्था स्वतः करी. या कामासाठी उठण्याच्या विचारात तो डुलक्या घेत होता. बाँबर विमानाची घरघर व पाठोपाठ झालेला बाँबस्फोटाचा धडाका यामुळे तो खडबडून पुरता जागा झाला. सत्यपरिस्थितीची कल्पना त्याला क्षणार्धातच आली. त्यामुळे त्याने ताडकन् अंथरुणाबाहेर उडी मारली! पत्नी व मुलांना बिछान्यातून ओरबाडून काढताना तो ओरडला, 'उठा! उठा! युद्ध सुरू झालंय्!'

स्वतः जलदीने बाथरूमचा गाऊन व चप्पल चढवीत त्याने मुलाला व मुलीला कपडे घालण्यास मदत केली. त्यांच्यासह तो बेलिजरच्या घराकडे धावला. तिथे एका जुनाट गढीच्या तळघरात बाँबहल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी उत्तम निवारा मिळणार होता. परंतु पाच वर्षांच्या अवखळ चक्लाा तळघरात कोंडून

घेऊन बाहेरची मजा लुटण्याची संधी दवडणे आवडले नाही. तो बापापाठोपाठ बाहेर धावला. जपानी विमाने ज्या भागातून घिरट्या घालीत मशिनगन्सचा तुफान मारा करीत होती त्या दिशेने तो सुसाट धावत सुटला!

चार्लस्ने त्याचा पाठलाग करून त्याला शर्थीने पकडले व मनाविरूद्ध तळघरात सुरक्षित परत आणले. पत्नीचा निरोप घेऊन पोशाख चढविण्यासाठी तो स्वतःच्या घराकडे निघाला. तेथे पोचतो न पोचतो तोच 'अरिझोना' जहाजाच्या स्फोटाच्या प्रचंड आवाजाने त्याच्या कानठळ्या बसल्या! तो जागच्या जागीच खिळला. हवेत बसलेल्या तुफानी धक्क्यापाठोपाठ मेंदू बधीर करणाऱ्या मानवी किंकाळ्या उमटल्या! घराच्या अंगणात धातूचे तुकडे, पोलादी पट्ट्या व इतर मोडतोडीचा पाऊस पडला! पोलादी कवचाचा एक मोठ्या आकाराचा तुकडा गॅरेजच्या लाकडी फळ्यांच्या दुहेरी भिंतीला भेदून आत घुसला आणि मोटारीच्या बंपरवर आदळून तिथे रूतून बसला! चार्लस्चे नशीब मात्र बलवत्तर होते. त्याला कसलीही दुखापत झाली नाही. पायजम्यावरच खाकी गणवेश ओढून पायातील सपातानिशी तो कसाबसा ऑफिसमध्ये हजर झाला!

कॅप्टन शूमेकरकडे विमानगृहे, ऑफिसेस, जेवणगृहे मद्यपानगृहे इत्यादींची व्यवस्था ठेवण्याचे काम होते. तो मोटारीतून हेड्क्वार्टरकडे जात असता अरिझोनाचा स्फोट झाला. मोटारीवर बाँबच्या तुकड्यांचा चहुकडून मारा झाला. त्यातूनही बचावून तो सागरी विमाने ठेवण्याच्या जागी पोचला. तिथे घडत असलेला अनर्थ पाहून त्याचे हातपायच गळाठले! आदल्या दिवशी वैमानिकांनी उड्डाणांची तालीम केली होती. त्यानंतर दुपारी दोन वाजता भर उन्हात शूमेकरने ही विमाने घातपातप्रतिबंधक


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

व्यवस्थेनुसार लावून ठेवली. ही व्यवस्था फार उत्तम झाल्याबद्दल सर्वांनी एकमेकांच्या पाठी थोपटल्या होत्या.

आणि आता पंख एकमेकांना चिकटतील इतकी जवळजवळ उभी केलेली ही विमाने एकामागोमाग धडाडून पेट घेत होती! विमानगृहातही आगीच्या वणव्याने थैमान घातले होते. अद्यापही आगीच्या तडाख्यात न सापडलेली विमाने कशीही करून ताबडतोब दूर नेण्याची आज्ञा शूमेकरने सोडली. यापेक्षा जास्त काही करणे शक्यच झाले नाही. थोड्याच वेळात फोर्ड-बेटावरील अग्निशामक दल तेथे पोचले. परंतु पाण्याच्या मुख्य पाईपवर 'अरिझोना' बुडाल्यामुळे त्याची मोडतोड होऊन पाण्याचा दाब नष्ट झाला होता! शूमेकरला हात चोळीत स्वस्थ बसावे लागले!

अॅडमिरल किमेल त्याच्या ऑफिसमधून युद्धाचे निरीक्षण करीत होता. त्याचा दुय्यम अधिकारी व्हाईसअॅडमिरल पाय त्याच्याजवळच उभा होता. पायचे कपडे 'कॅलिफोर्निया' जहाजावरील तेलाच्या शिडकाव्याने रंगले होते. ऑफिसमध्ये येण्यापूर्वी तो 'कॅलिफोर्निया'वर जाऊन त्याच्या नुकसानीची पाहणी करून आला होता. थोड्या वेळाने किमेलचा आणखी एक मदतनीस कॅप्टन स्मिथ ही तेथे आला. किमेल व पाय या दोघांना एकाच ठिकाणी उभे पाहून त्याच्या मनात चिंता उत्पन्न झाली. त्याने या दोघांना स्पष्ट जाणीव दिली, की असे एकत्र थांबल्यास कदाचित एकाच स्फोटात दोघांवरही मृत्यूची धाड पडेल. त्यामुळे हवाईतील आरमार नेत्याअभावी पोरके होईल! अॅडमिरल पाय् ताबडतोब इमारतीच्या दुसऱ्या भागात निघून गेला.

हल्ल्याला प्रारंभ होऊन जवळ जवळ १५ मिनिटांनी संपर्काधिकारी कर्टस् ऑफिसमध्ये हजर झाला. त्यावेळी जपानी विमानांचा टारपेडो हल्ला ऐन रंगात आला होता. टारपेडोफेकी विमाने छपरांच्या अगदी जवळून बंदराकडे झेप घेत होती. एकामागोमाग होणाऱ्या स्फोटांनी उडणारे पाण्याचे तुषार व धुराचे लोट यांनी आकाश काळवंडले होते. कार्टस्, किमेल व स्मिथ असहाय्यपणे खिडकीतून हे सर्व पहात होते.

हल्लेखोर विमाने जास्तीत जास्त एक अगर दोन विमानवाहू जहाजांवरून आली असावीत अशी या तिघांचीही त्याक्षणी तरी कल्पना होती. त्यामुळेच त्यांना हल्ल्याच्या प्रभावीपणाचे आश्चर्य वाटले. क्षितिजावर केवढे प्रचंड जपानी आरमार उगवले आहे याची त्यांना कल्पना नव्हती! कित्येक अमेरिकन अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी करणाऱ्या मंडळाशी बोलताना विमानवाहू जहाजांचा उल्लेख एकवचनीच केला. त्या रक्तलांछित रविवारी भयंकर चीत्कार करीत तुफानी हल्ला चढविणारी जपानी विमाने एक अगर दोन नव्हे तर सहा विमान वाहकावरून आली होती हे कित्येकांच्या गावीही नव्हते!

युद्धनौकाना पोचलेल्या हानिच्या बातम्या हळूहळू येऊ लागल्या,–' अरिझोनाचा स्फोट झाला. ओक्लोहामा उलँटली-कॅलिफोर्नियात पाणी शिरले. वगैरे.' या भयंकर बातम्या ऐकताना किमेलचे ओठ संतापाने व असहाय्यतेने थरथरत होते !

किमेलने या आरमाराची अधिकारसूत्रे स्वीकारून फक्त दहाच महिने झाले होते. सर्व जहाजे बदरातच ठेवण्याचा निर्णय घेऊन पुरते चोवीस तासही लोटले नव्हते, तोच ही जहाजे जळून नष्ट होत होती. त्यांच्या धुराने काळवंडलेले आकाश असहाय्यपणे पहात बसणे किमेलच्या नशिबी आले होते.

जपानी हल्ल्यामुळे हवाईमधील विमान सामर्थ्याचे भयंकर नुकसान होईल अशी धास्ती अनेक अमेरिकन अधिकाऱ्यांना युद्धाच्या प्रसंगी वाटली. त्यामुळे वाचलेल्या जहाजांचे संरक्षण करणेही अशक्य झाले असते. पण सुदैवाने अमेरिकन विमान-सामर्थ्याचा मर्यादित प्रमाणातच नाश झाला.

पुढे कधीतरी या क्रूर हल्ल्याचा सूड आपल्याला घेता यावा अशी तीव्र इच्छा किमेलला झालीली असेल. परंतु या सर्वनाशामुळे आपल्या कारकीर्दीचा शेवट होणार आहे याचीही त्याला जाणीव झाली असावी. एखाद्या कठीण लढाईत मिळा-लेल्या विजयाचे श्रेय सेनापतिला दिले जाईलच असे नाही. पण परामवाचे खापर मात्र नेहमी सेनापतिच्या डोक्यावरच फोडले जाते !

अमेरिकन जहाजांचा विध्वंस झाल्यामुळे किमेल फार दु:खी झाला. कित्येक उमद्या सैनिकांच्या मृत्यूमुळे त्याच्या अंत:करणास अतीव वेदना झाल्या. त्या दिवशी पर्ल हार्बरमध्ये २५०० सैनिक मारले गेले ! स्पॅनिश-अमेरिकन युद्ध व पहिले महायुद्ध या दोन्हीत मिळून जितके (अमेरिकन सैनिक) धारातीर्थी पडले त्या-पेक्षाही हा आकडा जास्त होता. किमेलला निव्वळ या सैनिकांची संख्याच ठाऊक नव्हती तर बहुतेकांना तो ओळखत होता, शेकडोंची नावे त्याला ठाऊक होती आणि अनेक जण त्यांचे चांगले मित्र होते. ताज्या दमाच्या खलाश्यापासून तो अनुभवी अधिकाऱ्यापर्यंत सर्वजण त्याची माणसे होती ! किमेलवर या सर्वांची जबाबदारी होती.

कर्टस् किमेलसह खिडकीजवळ उभा होता. एकाएकी खिडकीचे तावदान फोडून एक गोळी आत घुसली ! ती किमेलच्या छातीवर आदळली आणि त्याच्या शुभ्र गणवेशावर काळा डाग उमटवून निरुपद्रवीपणे खाली पडली ! दु:खाने व निराशेने किमेल स्वत:शीच कुरकुरला, ' तिने माझे प्राणच घ्यायला हवे होते !'

( क्रमश: )

(आधारीत)

पुस्तके

जयवंत चुनेकर

# जमुनाके तीर

मराठी साहित्य विश्वातले सर्वात विपुल लेखनाचे क्षेत्र कोणते असेल, तर ते कथांचे व कादंबऱ्यांचे. गुणवत्तेच्या निकषावर घासू पाहाता त्यातले किती साहित्य टिकेल, हा चर्चेचा मुद्दा होऊ शकेल. निखालसपणे चांगल्या म्हणता येतील अशा कथा-कादंबऱ्या प्रमाणतः कमीच. प्रस्तुतचा कथासंग्रह त्यापैकीच आहे, असे म्हणायला प्रत्यवाय नाही.

'जमुनाके तीर' हा वसुधा पाटील यांच्या अठरा कथांचा संग्रह. त्यातील कथा पूर्वी कुठल्या ना कुठल्यातरी मासिकातून एकोणीसशे सत्तावन्न सालापासून प्रसिद्ध होत आलेल्या.

संग्रहातल्या बहुतांश कथांमध्ये स्त्री ही केंद्रस्थानी आहे. (स्त्री लेखक असल्यामुळे असे झाले असेल का ?) निरनिराळ्या अनुभवविश्वातून त्या स्त्रिया वावरलेल्या आहेत. पण त्याबरोबरच हेही खरे, की पाटीलबाईंच्या नायिका एक विशिष्ट मुशीतून ओतल्यासारख्या वाटतात. कमी अधिक प्रमाणात बहुतांश कथातल्या नायिका जिद्दी, मनस्वी, मानिनी अशा आहेत. (तरीही त्यांची विविध रूपे त्यात आहेत) म्हणून कथांच्या वाचनानंतर त्यात एकसूरीपणा जाणवतो आणि तरीदेखील त्या वाचताना कुठेही कंटाळा येत नाही. त्या सतत मन बांधून ठेवतात. हे लेखिकेचे निर्विवादपणे यश आहे.

पाटीलबाईंच्या लेखनाचे वैशिष्टय असे की त्यांच्या लेखनात त्यांनी काही तांत्रिकदृष्टया नाविन्य आणले आहे किंवा अन्य काही प्रयोग केले आहेत अशातला मुळीच भाग नाही. तसं करायची लेखिकेला गरजच भासलेली नाही. त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे त्यातल्या व्यक्तिरेखा मुळातच जबरदस्त आहेत; लोकविलक्षण आहेत. ही पात्रे, म्हणजे बहुतेक नायिका ह्या विलक्षण तर खऱ्याच आणि तसे असूनही त्या आहेत मात्र सर्वसामान्य. त्यांची सुखंदुःखं त्यांची मनं यांच्याशी वाचक चटकन समरस होतो.

वास्तविक पाहाता यातल्या व्यक्तिरेखांचे मनस्वी, जिद्दी हे जे वैशिष्टय वर

उद्धृत केले, त्यामुळेच त्या थोड्याशा 'फॅंटॅस्टिक'ही वाटतात. उदाहरणार्थ 'मनू' या कथेची नायिका. अत्यंत अबोल, गबाळ्या पोषाखात वावरणारी; तरीही स्वतःचं अस्तित्व स्वतंत्रपणे टिकवू पाहाणारी, विवाहापूर्वी एकमेकांची पारख होण्यासाठी अवसर मिळावा म्हणून जोडीदाराबरोबर 'तसेच' राहण्याचा प्रयोग करून तो पचवणारी, मनस्वी, जिद्दी अशी ही मनू. एका बाजूला अशी ही निग्रही, मनस्वी मनू आणि दुसऱ्या बाजूला तिचे बाबा, ऑफिसचा हेडक्लार्क या सर्वसामान्य पातळीवरच्या व्यक्तिमत्त्वांमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा (पर्यायाने कथेचा) तोल सांभाळला जातो. या कथेतला महत्त्वाचा प्रसंग योगायोगाच्या स्वरूपाचाच आहे. त्यामुळे लेखनात खरे तर उणेपणा यायला हवा होता. पण तसे होत नाही. सबंध कथेत मनू कशी घट्ट पाय रोवून उभी राहिली आहे; कथेतले सारे परिमाण तिने व्यापून टाकले आहे. आणि म्हणूनच कथा संपूनही मनू डोक्यात घर करून बसते. जशी ही मनू विलक्षण मनाची तशीच 'मानिनी'मधील घटस्फोटिता निर्मला. तिने नवऱ्याशी पटत नाही म्हणून घटस्फोट घेतला आहे, आपल्या मुलाला घेऊन ती दूर झाली आहे. तिने स्वतंत्र घरकुल उभारले आहे. आपण मानिनी आहोत याची तिला जाणीव आहे आणि तरीही आपला मुलगा गेल्यानंतर ती अगतिक झाली आहे. आपल्या आयुष्यातला भकासपणा, पोकळी फक्त मातृत्वानेच भरून निघेल असा तिचा ठाम विश्वास आहे. पत्नीपदापेक्षाही मातृत्व अधिक महत्त्वाचे आहे असं मानणाऱ्या निर्मलेला म्हणूनच केवळ पुन्हा मूल व्हावे अशी उत्कट इच्छा झाल्यानंतरही ते 'आपल्या नवऱ्यापासूनच' व्हावे, असेही वाटते. त्यासाठी त्याच्याशी ती पुन्हा लग्न करण्याची परवानगी मागते. पण फक्त त्यासाठीच. तिची स्वतः मानिनी असल्याची जाणीव ती सोडायला तयार नाही !

वास्तविक ही कथा ज्या पद्धतीने लिहिली गेली आहे ती साधी सरळ निवेदन पद्धती आहे. ते एक दीर्घ पत्र आहे. कथेत घटना अशी काही घडतच नाही. आणि तरीही ही कथा परिणामकारक ठरते. त्यातली निर्मला लक्षात राहते; त्याचे कारण तिच्या व्यक्तिमत्त्वातली एक टोकदार कड. आणि तीच सतत लेखिकेने पुढे ठेवली आहे. भडकपणा न आणता.

'मानिनी'मधली जशी ही निर्मला त्याचप्रमाणे 'स्त्री'मधली इंदिरा. निर्मला निदान स्वतःसाठी तरी इतकी अगतिक झाली आहे; त्यामुळे तिने ती विलक्षण इच्छा व्यक्त केली आहे. इंदिरेला याबाबत तिच्यापलीकडे बसवावे लागेल. आपल्या थोरल्या विधवा बहिणीची वेदना तिने नेमकेपणाने समजावून घेतली आहे. आणि म्हणूनच तिने आपल्या पतीकडे लोकविलक्षण वाटणारी इच्छा प्रदर्शित केली आहे. इंदिरेच्या या वृत्तीचे अखेरीस होणारे दर्शन अनपेक्षित, धक्का देणारे असल्याने अक्कांच्या मनोवेदनेबरोबरच इंदिरेच्या वृत्तीतली लोकविलक्षण नि समंजस धीटाई कथेला आकार देते. कथेमध्ये प्रथमपासून अखेरपर्यंत सतत दोन moods लेखिकेने

खेळते ठेवले आहेत. आणि त्यांच्याशी संवादी अशी भाषाही वापरली आहे. त्यामुळे कथेची परिणामकारकता अधिक वाढते. कच्चा लेखक घसरण्यासारखी ठिकाणे या कथेत किंवा कथाविषयात आहेत. आणि म्हणूनच पाटीलबाईंच्या लेखणीचे अधिक महत्त्व मानले पाहिजे.

या संग्रहातील कथांमधल्या व्यक्ती ह्या वेगळ्या असूनही सर्वसामान्यांसारख्याच आहेत, असे जे सुरुवातीस म्हटले, त्याचे ह्या कथेतही ठळकपणे प्रत्यंतर येते. वस्तुतः कथेतले सारे वातावरणच अतिशय 'होम्ली' 'फमिलियर' आहे. आणि तरीही कथेच्या अखेरीस मात्र त्या वातावरणात विलक्षण तणाव निर्माण होतो. त्यातही विशेष हे की हा बदल जाणूनबुजून, हेतुतः केल्याचे अनुभवास येत नाही. म्हणूनच अक्कांची विलक्षण तडफड, इंदिरेच्या व्यक्तिमत्त्वातला समंजसपणा आणि विश्वनाथची कुचंबणा असे हे अनुभवांचे तिन्ही पदर एकत्र बांधले जाऊन एक घट्ट पट तयार होतो.

या तरुण नायिकांबरोबरच आपल्या नातवाला आपले पूर्वायुष्यातले प्रेमप्रकरण मोकळेपणाने सांगणारी विलक्षण आजी, ही एक 'म्हातारी' नायिकाही या कथासंग्रहात आहे! ('प्रीतीचंदान')

पाटीलबाईंच्या कथा नायिका या सामान्य असूनही असामान्य आहेत, याचं प्रत्यंतर देणारी 'अपेशी'ही आणखी एक कथा. यातली नायिका नमू ही एरव्ही आदर्श ठरावी अशी गुणसंपन्न मुलगी. परिस्थितीशी (आणि वडिलांशीही) जिद्दीनं टक्कर देणारी. पण तरीही अपेशी ठरलेली. लौकिकार्थाने सगळं मनाप्रमाणे मिळवून देखील आयुष्यातल्या फार मोठ्या सुखाच्याबाबतीत मात्र विलक्षण केविलवाणेपणाने अपेशी ठरलेली. एकावर प्रेम असणारी पण दुसऱ्याला शरीर द्यावं लागण्याएवढी कुचंबून गेलेली (जिद्दी) नमू लक्षात राहते, ती तिच्या या शोकांतिकेमुळे! इथेही पुन्हा घटना वेगाने घडणे, हा जो पाटीलबाईंच्या कथांचा विशेष तो ही व्यक्तिरेखा ठसविण्यासाठी उपयुक्त ठरतो.

'गानेवाला पंछी' ही संग्रहातली एक लक्षात राहाणारी कथा. जहांगीर या एका कलंदर छायाचित्रकाराच्या आयुष्यातल्या बऱ्या-वाईट घटना आणि त्याच्या सहवासातील मैना (नि पोपट) यांच्या निर्मळ बालमनावर त्यांचे उमटणारे प्रतिसाद यांचे हृद्य चित्रण या कथेत आहे. मैना ही यातला 'गानेवाला पंछी'! पण कथा जसजशी उलगडत जाते, तसतसे जहांगीरने मैनेला दिलेले हे नाव त्याच्या बाबतीच जास्त सार्थ ठरते, असे जाणवते. मैना आणि पोपट यांच्याइतकाच खरे तर निष्पाप असणारा जहांगीर गैरसमजाने नि अजाणता एका विलक्षण प्रसंगात सापडतो आणि आला तसाच पुन्हा एकटा निघून जातो, तो एक ओलावा निर्माण करून.

पाटीलबाईंच्या या कथातून घटना फार वेगाने घडत जातात. आणि यामुळेच त्या कथात ठाशीवपणा येतो. (ह्या उल्लेख मागे आलाच आहे.) 'लेबल' ही कथा यासाठी पहावी. यातला नायक श्रीनाथ ऐनापुरे एक हुशार, महत्त्वाकांक्षी पण हतभागी तरुण. त्याने स्वतःच्या आयुष्याचा एक आराखडा रेखाटला आहे. सुरुवातीला एखाद्या शिप्याप्रमाणे स्वार्थी, आपमतलबी; पण त्यानंतर भेटलेल्या शिक्षकांनी केलेल्या संस्कारांमुळे नंतर त्याने तो नव्याने रेखला.. स्वच्छ, सुंदर. वाईट मार्ग, साधनं चोखाळायची नाहीत अशा हिशेबाने. पण श्रीनाथ आपलं आयुष्य जगू लागतो आणि त्याच्या ह्या आरखड्याच्या रेषा भराभर बदलत जातात; त्याच्याच हातानं त्या त्याला बदलाव्या लागतात. अगदी विरुद्ध अशा. तो खरं तर सुख भरपूर मिळवतो, बडा असामी बनतो. पण त्याला ते सुख, बडेपण सतत सलत राहतं. किमती लेबल लावलेला फ्रॉक शिप्यानं मांडावा पण त्याचं कापड मात्र चोरलेलं असावं, तसा त्याच्या आयुष्याचा प्रकार झाला आहे.

या संबंध घटनांचा पट विणताना त्यांचा वेग फार आहे. श्रीनाथ ऐनापुरे याच्या आयुष्यातल्या घटना वेगानं घडत राहतात आणि त्याच्या व्यक्तिरेखेला आकार येतो. कथेच्या सुरुवातीला वापरलेले शिप्याच्या लेबलाचे प्रतीक आणि कथेच्या अखेरचा त्याच प्रतीकाचा वापर यानं श्रीनाथाच्या आयुष्याचं वर्तुळ पुरं झाल्यासारखं होतं ! प्रतीक प्रतिमा बनतं ! !

चित्रमयता, रेखीवता हा लेखिकेच्या लेखनाचा आणखी एक ठळक विशेष आहे. प्रत्येक कथेत थोड्याफार प्रमाणात तो आहेच. पण 'माझे आईवडील', 'आम्ही तिघे', 'बिऱ्हाड' यांसारख्या कथात तो प्रकर्षाने जाणवतो. याचाच काहीसा तरल अविष्कार 'श्रीनिवास पानसेचे अंगण' या कथेत जाणवतो. इथेही चित्रमयता हाच कथेचा अविभाज्य भाग ठरतो. एखादं चित्र रेखीव असलं, तरी त्या रेखीवतेमुळेच ते डोळ्यात खुपण्याची शक्यता असते. वसुधा पाटील यांच्या कथेत तसं होत नाही. कारण या साऱ्या रेखीवतेत एक तोल संभाळलेला असतो. मग तो कधी कुटुंबातल्या विविध व्यक्तींच्या स्वभावदर्शनामुळं असेल, तर कधी नायिकेच्या (वा नायकाच्या) स्वभावातील भिन्नभिन्न वैशिष्ट्यांमुळे असेल.

'माझे आईवडील', 'आम्ही तिघं', 'बिऱ्हाड' या कथा तर हृद्य अशी कुटुंबचित्रंच आहेत. त्या एका अर्थाने कथा नव्हतेच. त्या लक्षात राहतात त्या त्यातल्या कौटुंबिक, सरळसाध्या वातावरणांमुळेच.

या कथासग्रहातली क्रमाने शेवटची पण गुणांनी फार उजवी अशी कथा म्हणजे 'जमुना के तीर'

वरवर पाहता विरोधी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या परंतु आंतरिक व्यथा एकच असणाऱ्या दोन जीवांची ही कथा. कथाविषयाची हळुवार हाताळणी केल्याने ह्या कथेची पातळी एकदम उंचावते. हा हळुवारपणाच मग सहजपणे काव्यात्मकतेचे

रूप घेतो. आणि मग भाषेत एक लय येते.

गिरिजा आणि पुरुषोत्तम या व्यक्तिमनांशी जवळीक निर्माण होते, यांच्यासंबंधी जिव्हाळा निर्माण होतो. कथेतल्या अनुभवाला वाचक फार त्वरेने सामोरा जातो.

गिरिजा एक नगरवधू आहे. आलिशान, मिजासखोर, ऐषआरामी जीवन जगणारी. कथेच्या सुरुवातीलाच हे कळून येते आणि त्याचवेळी तिच्यासंबंधी कणवही दाटून येते. तिच्या मनातं खोलवर एक दुःख आहे. आणि ते 'जमुना के तीर'च्या आर्त स्वरांबरोबर उफाळून वर येतं, 'आतून तटातट तुटून आल्यासारखं होतं!' तिच्या आयुष्याच्या आरंभाची तिलाच कल्पना नाही; शेवट कसा, कुणाच्या सान्निध्यात होणार आहे याचीही कल्पना नाही. आणि अशा वेळी तिच्या आयुष्यात एक पुरुष आला. (खरे तर ती नगरवधू म्हणजे 'पुरुष' तिला नवा नाही). एक कोसळून गलेला 'पुरुषोत्तम' (बांदेकर) आपल्यातल्या पुरुषत्वाचा शोध घेत घेत गिरिजेपाशी येऊन पोचला आहे. भरपूर संपत्ती असणारा हा पुरुष एक विलक्षण दुःख उरात बाळगून पिचतो आहे आणि उपाय म्हणून तो गिरिजेकडे आला आहे. गिरिजेला अस्वस्थ करणाऱ्या त्या संध्याकाळी तो तिच्याकडे आला आहे. तिला आपले दुःख सांगता सांगता गिरिजा नकळत त्याच्याशी समरस झाली आहे. अजाणतेपणाने पुरुषोत्तमाला आवडणारे आणि गिरिजेला आवडणारे गीतही एकच निघते. 'जमुना के तीर' दोघांच्याही आंतरिक अनामिक व्यथांना जोडणारा तो एक दुवा; पाहता पाहता तो पुरुषोत्तमाला आपण 'पुरुषात' आल्याची जाणीव करून देतो आणि गिरिजाही जणू आपली आजवरची अस्वस्थता त्याच्यात विरवून टाकते!

ही कथा असा हा काव्यात्म अनुभव देते. पाटीलबाईंची मुलायम भाषाही या ठिकाणी तो अनुभव तीव्र करण्याला साहाय्य करते, काहीशा सूक्ष्म, मृदू, अनुभवाचे लेखिकेने विलक्षण तन्मयतेने आणि भडकपणा न आणता प्रत्ययकारी चित्रण यात केले आहे. कथासंग्रह हातावेगळा केल्यावर दीर्घकाळ मनात घोळणारी ही कथा; हे पाटीलबाईंच्या कथालेखनाचे यश मानले पाहिजे!

कथांमध्ये कुठे भावनांची अकारण गुंतागुंत नाही; 'मनोविश्लेषण' वगैरेही काही नाही. काहीही मोठे सांगण्याचा आव न आणता जे जाणवले ते सच्चेपणाने व्यक्त करणाऱ्या साध्या सरळ कथा, तरीही लक्षात राहतात त्या त्यांच्या व्यक्तिप्रधान वैशिष्ट्यांमुळे, त्यांच्या सहजाभिव्यक्तीने, चित्रमयतेने आणि यामुळेच येणाऱ्या आंतरिक सौंदर्याने; 'न्यूड' सारख्या कथेत व्यक्त होणाऱ्या कलावताच्या धीटाईमुळे!

जमुना के तीर: लेखिका वसुधा पाटील, पृ. २२८,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ WB; मूल्य रु. ८-००.

# एका कादंबरीचा लेखनप्रपंच

लेखकाची साहित्यकृती सिद्ध होण्यापूर्वी या ना त्या प्रकारची पूर्वतयारी प्रत्येक लेखक करत असतो. काही लेखकांना अत्यंत जुजबी तयारी पुरते; तर काही लेखक अत्यंत मेहनतीने तपशीलवार तयारी करतात. एखाद्या इमारतीचे नीलचित्र असावे तसे यांच्या तयारीचे स्वरूप असते. आयर्व्हिंग वॉलेस हा अमेरिकन कादंबरीकार अशा तयारीसाठी प्रसिद्ध आहे.

१९६१ साली त्याने 'द प्राइझ' ही आपली कादंबरी लिहिली. नोबेल पारितोषिक देण्यामागे चालणाऱ्या राजकारणाचे विदारक चित्र या कादंबरीत रेखाटले आहे... ही कादंबरी आपण कशी लिहिली, याची हकीगत वॉलेसने एक स्वतंत्र पुस्तक लिहून सांगितली आहे. प्रस्तुत पुस्तकाचे नाव आहे: 'द रायटिंग ऑफ वन् नॉव्हेल' या पुस्तकात वॉलेसच्या कार्यपद्धतीची आणि प्रत्यक्ष कार्याची जी माहिती कळते ती मनोरंजक आणि उद्बोधक आहे.

कादंबरी-कल्पनेचा गर्भसंभव, गर्भवास आणि जन्म असे पुस्तकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. परिशिष्टात कामाचा आराखडा आणि कादंबरीची रूपरेषा दिली आहे.

पहिल्या भागात, नोबेल पारितोषिक देण्यामागील कार्ययंत्रणेच्या पाहणीत आपल्याला काय आढळेल ते वॉलेसने सांगितले आहे. त्यातील काही तपशील आश्चर्यजनक तर काही खेदजनक आहे. उदा. १९४६ साली, नोबेल पारितोषिकाचा निर्णय करणाऱ्यांपैकी एकाला जेम्स जॉईस हे नावच ठाऊक नव्हते. १९४५, साली, साहित्याचे नोबेल पारितोषिक मिस्ट्राल या कवयित्रीला मिळाले. कारण निर्णयकर्त्यांपैकी एकाला तिच्या कविता इतक्या आवडल्या की इतर निर्णयकर्त्यांचे मन वळवण्यासाठी त्याने तिच्या कवितांचा अनुवाद त्यांना सादर केला.

कल्पना सुचवल्यावर दोन वर्षे वॉलेस स्वस्थ बसला. मग त्याने संशोधनकार्याला सुरुवात केली. स्वीडनमध्ये काही माणसे त्याने या कामांवर नेमली. शिवाय पूर्वीच्या पारितोषिक-विजेत्यांच्या मुलाखती घेतल्या वा त्यांच्याकडून माहिती मागवली... अशा सोळा वर्षांच्या अभ्यासानंतर वॉलेसची कादंबरी सिद्ध झाली.

परिशिष्टात सादर केलेला हा कामाचा आराखडा

पहा : संशोधन : २६० कामाचे दिवस; ८५७ कामाचे तास /
कल्पित भागासंबंधीची टिपणे : ३६ दिवस; २८८ तास /
पहिल्या खर्ड्याचे पुनर्लेखन : ८४ दिवस; ६७२ तास / इत्यादी.
मुद्रिते तपासणे : १७ दिवस; १३६ तास.
एकूण काम : ५८२ दिवस; ३,१०१ तास.

**'बुक्स अँड बुकमेन': फेब्रुवारी १९७० वरून**

# अकरावी राष्ट्रीय खोखो स्पर्धा, रोहटक

शरद भाटे

यंदाचे वर्ष खोखो खेळाच्या दृष्टीने महाराष्ट्राला फारच अनुकूल ठरले. महिन्यापूर्वी झालेल्या कुमारांच्या राष्ट्रीय खोखो स्पर्धेत विजेतेपद महाराष्ट्राने मिळविले. तर २६ ते ३१ डिसेंबरपर्यंत रोहटकला झालेल्या पुरुषांच्या व महिलांच्या गटात अजिक्यपद मिळवून एकूण तिहेरी मुकुट पटकाविला. पुरुष व कुमार गटातील उत्कृष्ट खेळाडूंची पारितोषिके महाराष्ट्र खेळाडूंनाच मिळाली. महिला विभागातील हे पारितोषिकही जर मिळाले असते तर तो सर्वोच्च बहुमान (ग्रँड स्लॅम) ठरला असता.

महाराष्ट्राच्या या यशस्वी वाटचालीला सुरुवात त्यांच्या कुमार संघाने केली. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ही स्पर्धा हैद्राबादला झाली. गेली दोन वर्षे कुमारांची राष्ट्रीय स्पर्धा होणार म्हणून गाजली पण यंदा मात्र ती मूर्त स्वरूपात उतरली. पहिलेच वर्ष असल्यामुळे पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. महाराष्ट्र-म्हैसूर हा अंतिम सामनाच काय तो रंगला. या सामन्यात महाराष्ट्र खेळाडूंनी कौशल्य-पूर्वक डावपेच व आत्मविश्वास यांच्या जोरावर म्हैसूरवर (७-६) गुणांनी मात केली. पुण्याचा हेमंत जोगदेव या विजयाचा प्रमुख वाटकरी ठरला. पहिल्या डावात ३ मिनिटे तर दुसऱ्या डावात ४।। मिनिटे जोगदेवने प्रतिपक्षाला दमविले. सर्वोत्कृष्ट खेळाडूचे वीर अभिमन्यु पारितोषिक त्याला देण्यात आले. कर्णधार जोगदेव ५ सामन्यात ५ वेळा खेळला. त्यापैकी दोन वेळा नाबाद राहून त्याने एकूण १७ मि. ५५ सेकंद खेळ केला. आक्रमणातही त्याने १४ खेळाडू बाद केले. १५ वर्षांचा हेमंत जोगदेव पुण्याच्या सन्मित्र संघातर्फे खेळत असून अखिल भारतीय पातळी-वरील स्पर्धात तो संघाच्या पहिल्या तुकडीत खेळतो. यंदा धुळयाला झालेल्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट लहान खेळाडू म्हणून त्याची निवड झाली.

रोहटकला डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात झालेली ११ वी पुरुष व महिला राष्ट्रीय खोखो स्पर्धा अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरली. प्रथमतः हे सामने हरियानातच पण गुटगावला घेण्याचे ठरले होते, पण अगदी ऐनवेळी हा बेत बदलण्यात आला व सामने रोहटकला घेण्यात आले. त्यामुळे तयारीतील घाईगर्दीपणा अगदी पदोपदी जाणवत होता. छोटूराम कॉलेजच्या मोठ्या क्रीडांगणावर हे सामने घेण्यात आले.

हरियानात हॉकी, फुटबॉल हे खेळ विलक्षण लोकप्रिय आहेत. खोखो खेळ बहुतेकांना माहित नाही. असे असताना हरियाना राज्य खोखो समितीने अखिल भारतीय स्वरूपाच्या स्पर्धा भरविण्यात निश्चितच धाडस दाखविले.

१४ पुरुष व महिला संघांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर, विदर्भ, हैद्राबाद हे पुरुष संघ व मध्यभारत, विदर्भ, महाराष्ट्र, गुजरात, म्हैसूर हे महिला संघ प्रथम दर्जाचे होते. दिल्लीच्या पुरुष संघाने खोखोत कौतुकास्पद प्रगती केल्याचे आढळून आले. महाराष्ट्र, गुजरात या दोन बलवान व अनुभवी संघातच विजेतेपदासाठी लढत होणार हे सुरुवातीपासूनच माहित होते. यातसुद्धा महाराष्ट्र, गुजरातवर अगदी सहजगत्या विजय मिळवेल असा जाणकारांचा अंदाज होता. दोन महिन्यापूर्वीच मुंबई व धुळे येथील अखिल भारतीय स्पर्धेत गुजरातच्या संघावर सहजगत्या मात केलेल्या पुण्याच्या नवमहाराष्ट्र संघ व सन्मित्र अशा दोन संघातील खेळाडूंचा महाराष्ट्र संघात समावेश होता.

बगलोर येथील गतवर्षीच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा पराभव केलेल्या म्हैसूर संघाचा काहीच प्रभाव पडू शकला नाही. महाराष्ट्राने म्हैसूरवर (१५–६) गुणांनी विजय मिळविला. अरविंद पटवर्धन यांनी ३॥ मिनिटांची दमदार पळती करून म्हैसूरच्या खेळाडूंना दमविले तर राजेंद्र द्रविड यांनी झंझावाती पाठलागावर पाच बळी घेतले.

अंतिम सामनाच काय तो चुरशीचा झाला. गुजरातचे सर्वोत्कृष्ट खेळाडू सुधीर परब पहिल्या डावात अगदी लवकर बाद झाल्याने महाराष्ट्राला पहिल्या डावात एका गुणाचे आधिक्य मिळाले. (६–५). महाराष्ट्राने पुन्हा सहा गडी बाद करून गुजरातला विजयाकरता सात गडी बाद करण्याचे आव्हान दिले. पण गुजरात चारच खेळाडू बाद करू शकले. अरविंद पटवर्धन (३॥ मि.) प्रकाश शेठ (२ मि.) व सुधीर चिटणीस (१॥। मि.) यांनी पळतीत उल्लेखनीय कामगिरी केली. सर्वात लहान खेळाडू राजेंद्र द्रविड याचा पाठलाग कौतुकास्पद होता.

सर्वोत्कृष्ट खेळाडूस मिळणारे एकलव्य पारितोषिक महाराष्ट्राचा अरविंद पटवर्धन यांनी मिळविले. सबंध स्पर्धेत पळतीतील सातत्य व त्या जोडीला समजूतदार पाठलाग पटवर्धन यांनी केला. उत्तम स्टेपिंगच्या सहाय्याने साखळी पद्धतीचा शास्त्रोक्त खेळ करणे हे त्यांच्या खेळाचे वैशिष्ट्य असून त्या जोरावरच ते प्रति-

पक्षाच्या खेळाडूची दमछाट करतात व नंतर त्याचा फायदा घेऊन चौघात हुलकावण्यावर त्यांना झुलवितात. तीन वर्षे राष्ट्रीय व विद्यापीठ स्पर्धेत भाग घेणारे अरविंद पटवर्धन पुण्याच्या नवमहाराष्ट्र संघाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. नवमहाराष्ट्र संघातर्फे अनेक अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धात भाग घेऊन आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

महिला विभागातील सामने अत्यंत वैशिष्ठ्यपूर्ण ठरले. महाराष्ट्र संघाने तर आत्तापर्यंत कधीही नव्हती एवढी कौतुकास्पद कामगिरी केली. पहिल्याप्रथमच अंतिम फेरीत प्रवेश करून मध्य भारतासारख्या बलाढ्य संघाबरोबर बरोबरी केली व संयुक्त विजेतेपद पटकाविले. आपल्या गटातून बाहेर येण्याचीसुद्धा महाराष्ट्राची दुसरीच वेळ होती. उपान्त्य सामन्यात गुजरातसारख्या राष्ट्रीय स्पर्धेत सतत तीन वर्षे अजिंक्य असलेल्या संघावर चुरशीने विजय मिळवून प्रेक्षकांना आश्चर्याचा धक्का दिला. कायमचा स्मरणात राहील एवढा हा सामना चुरशीचा झाला. एकदा (५-५) अशी बरोबरी झाली. जादा खेळलेल्या तिसऱ्या डावात महाराष्ट्राने (३-२) गुणांनी गुजरातवर मात केली. महाराष्ट्राच्या पहिल्या तुकडीतील जयश्री देशपांडे, उषा नगरकर व रेखा लुंकड यांनी सातत्याने उत्कृष्ट पळती केली. या तिघी पुण्याच्या कन्याशाळेच्या विद्यार्थिनी असून राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याची त्यांची पहिलीच वेळ होती. महाराष्ट्र खेळाडूंचा पाठलागही यंदा जोरदार होता. गुजरातची गतवर्षीची राणी लक्ष्मीबाई पारितोषिक विजेती अचला देवरे दोन्हीवेळा एका मिनिटातच बाद झाली. भावना व ज्योति या पारेख भगिनींनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. अखेरीस (३-२) गुणांनी महाराष्ट्र विजयी झाला.

मध्यभारत व विदर्भाचा सामना अतिशय चुरशीचा होऊन गाजला. एकदा तिसऱ्या डावातही बरोबरी झाल्याने सामना पुन्हा खेळावयास लागला. नंतर मात्र मध्य भारताने एका गुणाने विदर्भावर मात केली. सर्वात लांबलेल्या या सामन्यात मध्य भारताची ज्योति रोडे एका डावात सात मिनिटे तर कुमारी चतुर दुसऱ्या डावात सात मिनिटे खेळली. विदर्भाकडून मीरा चौधरी सात मिनिटे पळाली तर शैलजा पिंगे (५॥ मि.) व उषा गुंदाने (४॥ मि.) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

एवढा बराच काळ चाललेला सामना खेळूनही दोन तासानंतर लगेचच झालेल्या अंतिम सामन्यात मध्य भारताच्या मुलींनी महाराष्ट्राबरोबर शर्थीची झुंज दिली. हाही सामना बरोबरीने सुटला पण अखेरीस दोन्हीही संघांना संयुक्त विजेतेपद दिल्याचे जाहीर करण्यात आले. मध्य भारताच्या ज्योति रोडे (३ मि.) व उषा गुंदाने (३ मि.) यांची पळती उल्लेखनीय ठरली तर महाराष्ट्राकडून उषा नगरकर (२। मि.) खेळली. सर्वोत्कृष्ट खेळाडूचे राणी लक्ष्मीबाई पारितोषिक मध्य

भारताच्या ज्योति रोडे या शाळकरी विद्यार्थिनीस देण्यात आले. जयश्री देशपांडे, उषा नगरकर व रोडे या-तिघीत या पारितोषिकासाठी चुरस होती. अंतिम सामन्यात मात्र ज्योति रोडे दोन्ही डावात या दोघीपेक्षा चांगली खेळली. अन्यथा आधीच्या सामन्यांवरून महाराष्ट्राच्या या दोन खेळाडूंपैकी एकीला हे पारितोषिक मिळावयास हरकत नव्हती. मुंबई व धुळे येथील अखिल भारतीय स्पर्धा गाजविलेली रेखा लुंकड ही मात्र अपेक्षेप्रमाणे प्रभाव पाडू शकली नाही.

गेल्या दहा वर्षांच्या राष्ट्रीय स्पर्धांकडे नजर टाकता महाराष्ट्राच्या पुरुष संघाची कामगिरी कौतुकास्पद आहे. तर महिलांनी यंदा फार मोठा पराक्रम गाजविलेला आहे. पुरुषांनी पाचव्यांदा विजेतेपद मिळविले तर हा मान महिलांनी पहिल्यांदा मिळविला. एकलव्य पारितोषिक मिळविणारा अरविंद पटवर्धन हा महाराष्ट्राचा चवथा खेळाडू आहे. प्रथमच झालेल्या कुमारांच्या स्पर्धेत महाराष्ट्र विजयी ठरला तर 'वीर अभिमन्यु' हेमंत जोगदेवने मिळविले.

हरियानात एवढी मोठी खोखोची स्पर्धा प्रथमच झाल्यामुळे प्रेक्षकांनी पाहिजे तेवढा प्रतिसाद दिला नाही. अंगाभोवती चादरी लपेटलेल्या प्रेक्षकांची संख्या सर्व राज्यातील खेळाडूंपेक्षा कमीच होती. कडक थंडीमुळे सामने सकाळी नऊ व दुपारी दोन वाजता सुरू होत.

स्पर्धेच्या आधी महाराष्ट्र खेळाडूंचे शिबिर पुण्यात घेण्यात आले होते. सांघिकवृत्तीच्या दृष्टीने त्याचा अतिशय फायदा झाला.

दरवर्षी एक गोष्ट मात्र प्रकर्षाने खटकते, ती म्हणजे खोखो खेळणारे बहुतेक सर्व खेळाडू मध्यम स्थितीतले आहेत असे असताना त्यांना जाण्यायेण्याचा खर्चाचा भुर्दंड का पडावा? इतर सर्व राज्यांच्या संघाचा खर्च तेथील ॲसोसिएशन्सनी दिला होता. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी खेळाडूंना खर्च स्वत: करावा लागत नाही. असे असताना व महाराष्ट्र खेळाडू खोखोत सर्वोच्च असताना त्यांच्यावर हा अन्याय का? अशी व्यवस्था खोखोसाठी का असू नये?

पंडित वि. म. जोशी

ज्योतिष विशारद

# अंदाज

१६ ते २२ जानेवारी १९७१

**मेष :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थितीत अपेक्षित सुधारणा होईल. स्थावरासंबंधीचे व्यवहार उलगडतील. अचानक धनलाभाचा योग शुक्रवारी येईल. सरकारी कामात यश मिळेल. शनी, रविवर आणि स्वगृहावर पूर्ण पाहतो आहे. मानमान्यता मिळेल. थोडासा स्वभावात हेकटपणा वाढेल. गुरुवारी याचा अनुभव येईल.

विद्याभ्यासात थोडेसे अडथळे येतील. सरकारकडून प्रकाशक, लेखकांना मंजूर झालेल्या रकमेत अडथळे निर्माण होतील. संततीचा उत्कर्ष खासच होईल. पण संततीची वागणूक जराशी तुटक राहील. प्रवासयोग येईल. प्रवासात झालेल्या सहज मैत्रीमुळे भाग्योदयाला मदत होईल. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७।८ या स्थानातून होत आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा १६।१९।२०।२२.

**वृषभ :** शरीरप्रकृती चांगलीच होईल. अविवाहितांचे विवाह जमण्याचा योग आहे. सप्तमातील गुरु-शुक्र-मंगळ अत्यंत शुभफल देतील. घरबसल्या मागणी येऊन मनासारखे लग्न होईल. धनस्थिती चांगली राहील. वाचाशुद्धी वाढेल. वडिलार्जित घर, जमिनीबद्दल मिळणारे पैसे हातात पडण्याची शक्यता आहे. धाकट्या भावंडाच्या वागणुकीने गृहसुखात व्यत्यय येईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. वरच्या परीक्षांमध्ये अपयश येईल. मातुल घराण्याकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. उद्योगधंद्यात माघार घ्यावी लागेल. भाग्यहानी होईल. फक्त एकच शुभयोग आहे. भाग्यातील चतुर्थेश रवी सर्व संकटातून सुखरूप पाडील. शुक्रवारी अचानक धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६।७ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. रविवार, सोमवार बौद्धिक व्यवसायात जातील. शुभ तारखा १७।१८।२१।२२.

**मिथुन :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थिती नाजूक होईल. शनिवारी आर्थिक अडचण जाणवेल. रविवार-सोमवारी घरात काहीतरी शुभसमारंभ होईल. दिवस आनंदात जातील. आत्मघातकी विचार मनात येतील. भावंडांकडून मनस्ताप करणाऱ्या गोष्टी घडतील. प्रवासात अडथळे निर्माण होतील. मित्रमंडळीकडून अचानक धनलाभ होण्याला मदत होईल.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल. कलावंतांना दिवस चांगले आहेत. मानमान्यता वाढेल. भागीदार सर्व बाजूंनी मदत करतील. पति-पत्नीत थोडासा मतभेद होईल. धंदाव्यवसाय चांगलाच चालेल. साहित्य, कला, प्रकाशन या व्यवसायात असणारांना प्रगतीपर दिवस आहेत. प्रेमप्रकरणे जशी आहेत तशीच राहतील. सदसद्विवेक-

बुद्धी जागृत होईल. चंद्राचे भ्रमण ३।४।५।६ या घरातून आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा १७।१८।२१।२२.

**कर्क :** शनिवारी शरीरप्रकृती नरमच राहील. धनस्थितीत अपेक्षित सुधारणा होईल. सरकारकडून येणारा पैसा हातात पडेल. भावंडांसह मामाकडे जाण्याचा योग येईल. संततीचा विद्येत उत्कर्ष होईल. पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. बुधवार, गुरुवार घरातच काही समारंभ होऊन दिवस आनंदात जातील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश मिळेल. मेडिकल शास्त्रे शिकणाऱ्या २८ ते ३२ वयातील व्यक्तिचानाव लौकिक वाढेल. मिलिटरीत असलेल्या मुलांना वरच्या जागा मिळतील. प्रेमविवाह जमण्याचा योग आहे. हा योग शुक्रवारी जोरदार आहे. पत्नीमुळे भाग्योदय होईल. स्त्री मैत्रिणींची मदत सर्व बाजूंनी होईल. घरातल्या लोकांकडून फारच कौतुक केले जाईल. चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. प्रवासात त्रास होईल. शक्यतर प्रवास टाळावा. शुभ तारखा १७ ते२२.

**सिंह :** शरीरप्रकृती नरम राहील. मानसिक त्रास फार होईल. स्वभावात साधुत्व येईल. धनस्थिती अतिशय चांगली राहील. स्थावरांचे पैसे येणारे असतील ते हातात पडतील. भावंडांकडून सर्व कामात मदत होईल. चतुर्थातील गुरु-मंगळ-शुक्र युती सुख वाढवील. घराचे सर्व प्रश्न सुटतील. घरात शुक्रवारी शुभसमारंभ होईल

विद्याभ्यासात भरघोस यश प्राप्त होईल. कलाकारांना जगापुढे येण्यास दिवस चांगले आहेत. संततीचा भाग्योदय होईल. मिलिटरीत इंजिनिअरिंग डिपार्टमेंट-मध्ये असलेल्या मुलांना एकदम वरची जागा मिळेल. फॅन्सी वस्तूच्या व्यापाऱ्यांना अमाप धनलाभ होईल. चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारखेरीज सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानाची स्थिती चांगली राहील. शनिवारी मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे. हातून पराक्रम होईल. १७ ते ३२ वयाच्या व्यक्तींचा भाग्योदय होईल. भावंडांची सर्व बाजूंनी प्रगती होईल. सरकारी कामात संपूर्ण यशःप्राप्ती होईल. मेडिकल व्यवसायातील व्यक्तींना मान-मान्यता मिळेल. विद्याभ्यासात अपयश येईल. अनेक अडचणी उत्पन्न होतील. सरकारकडून अनुदान मिळणाऱ्या संस्थांना अगर व्यक्तींना फारच त्रास होईल. फॅन्सी वस्तूंच्या एजंटाना अमाप फायदा होईल. बौद्धिक व्यवसायातील लोकांना प्रगतीपर आठवडाआहे. संतती नीट वागणार नाही.

चंद्राचे भ्रमण १२।१।२।३ या स्थानातून आहे. ते तितकेसे चांगले नाही. बुधवार, गुरुवार, द्रव्याची अडचण येईल. शुभ तारखा १६।१७।१८।१९.

**तूळ :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थिती अत्यंत चांगली असेल. धन-स्थानातील गुरू-शुक्र-मंगळ सर्व बाजूंनी पैसा आणतील. घरात पाव्हणेमंडळी येतील व दिवस आनंदात जातील. शुक्रवारी घरात फारच मोठा शुभसमारभ

होईल. स्थावर संपत्तीचे व्यवहार सहज चांगल्या रीतीने उलगडतील. सरकारकडून सर्व तऱ्हेची मदत होईल.

विद्याभ्यासात अनेक अडचणी येतील. शनिवार या बाबतीत फार वाईट जाईल. मानसिक यातना होतील. संततीचा उत्कर्ष होईल. मातुल घराण्याकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. शत्रूसुद्धा मदतीला धावून येतील. चंद्राचे भ्रमण ११।१२।१।२ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. शुभ तारखा १६।१९।२०।२१।२२.

**वृश्चिक :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत समाधानकारक सुधारणा होईल. अचानक धनलाभ होईल. सरकारी कामाकरता प्रवास घडेल. त्यात भरघोस नफाच होईल. शनिवारी घरात थोडासा मतभेद होईल. मित्रांकडून धनलाभाला मदत होईल. उद्योगधंदा चांगला चालेल. लग्नातील गुरू-शुक्र-मंगळ योग गृहसौख्य वाढवील.

विद्याभ्यासात संपूर्ण यशःप्राप्ती होईल. जे काही हाती घेतले असेल त्यात मनासारख्या घटना घडतील. संततीचा उत्कर्ष होईल. परदेशगमनाचा योग येईल. शत्रूंचा पराभव होईल. पत्नी अत्यंत प्रेमळपणाने वागेल. शुक्रवारी अचानक विवाहाची मागणी आपणहोऊन येईल. हा अनुभव २७ ते ३२ वयातील व्यक्तींना येण्याचा जोरदार योग आहे. चंद्राचे भ्रमण १०।११।१२।१ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. इंडिकेट संघटनेला सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**धन :** शरीरप्रकृती जराशी नरम राहील. गुरू-मंगळ-शुक्राना योगबल आहे पण स्थानबल नाही. धनस्थिती बरी राहील. खर्च उत्पन्नापेक्षा जास्त होईल. अचानक धनलाभ होईल. धाकट्या भावंडाकडून त्रासदायक वागणूक होईल. सुखप्राप्ती होईल. गुरु व्ययात असला तरी त्याची सुखस्थानावर दृष्टी आहे. त्याचा शुक्र-मंगळाशी योग आहे, तो चांगला आहे. विद्येत थोडीशी माघार घ्यावी लागेल. कलावंतांची थोडीशी अडचणच होईल. भागीदार चांगले वागतील. बौद्धिक व्यवसाय चांगले चालतील. शनिवारी मानसिक त्रास होईल. उद्योगधंदा चांगला चालेल. विवाहाची मागणी येईल. हा योग शुक्रवारी येईल. चंद्राचे भ्रमण ९।१०।११।१२ या स्थानातून आहे. ते अतिशय चांगले आहे. शुभ तारखा १७ ते २१.

**मकर :** शरीरप्रकृती चांगली राहील. शनिवारी धनस्थिती नाजूक होईल. भावंडांकडून सर्व प्रकारची मदत होईल. प्रवासयोग येईल. प्रवासात भेटणाऱ्या मित्रांकडून कायम स्वरूपाची शुभघटना घडण्याचा जोरदार योग आहे. घरात शुभकार्य होण्याचा योग शुक्रवारी आहे. स्त्री मित्रांकडून अनेक प्रकारचे साहाय्य मिळेल. दिवस आनंदात जातील.

विद्याभ्यासात शुभयोग घडून येतील. सरकारकडून विद्यावंतांचा मानसन्मान होण्याचा जोरदार योग आहे. बुधवार-गुरुवारी धंदा व्यवसायात अनपेक्षित प्रगती होईल. भागीदार मदतीला धावून येतील. पत्नीचे सहाय्य भरपूर मिळेल. शत्रुनाश होईल. चंद्राचे भ्रमण ८।९।१०।११ या स्थानातून आहे. ते साधारण आहे. शुभ तारखा १७ ते २२.

**कुंभ** : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थानची स्थिती चांगली सुधारेल धनेशकारक अधिपती गुरु दशमात. भाग्येश दशमेश शुक्र, मंगळाबरोबर आहे. हा योग स्थिर कुंडलीत असल्यास ती व्यक्ती नेहमी संपत्तीत लोळत राहते. प्रवासाचा योग आहे. त्यात फायदाच होईल. सरकारी कामात अपयश येण्याचा योग आहे. रवि कुंभेत जाईपर्यंत कामे पुढे ढकलावी.

विद्याभ्यासात प्रगती, गृहसौख्यात वाढ होईल. घराचे प्रश्न समाधानकारक सुटतील. धदाव्यवसाय चांगला चालेल, कलाप्रसाधनांचे व्यापारी अमाप धन कमावतील. प्रेमाच्या लफड्यात सापडण्याचा दाट संभव आहे. मित्रांकडून सर्व बाबतीत मदतच होत राहील. पत्नीशी थोडा मतभेद होईल. चंद्राचे भ्रमण ७।८।९।१० या स्थानातून आहे ते साधारण आहे. शनिवारी मनस्वास्थ्य बिघडण्याचा योग आहे. शुभ तारखा १९ ते २२. शुक्रवारी सर्व मनःकामना पूर्ण होतील.

**मीन** : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थितीत सर्व बाजूंनी सुधारणा होण्याचा योग आहे. भाग्यातील गुरु-मंगळ-शुक्र युती सर्व अडचणी नाहीशा करील. घरात सुखशांतता वाढेल. जागेचे प्रश्न सुटण्याचे मार्गावर येतील. शत्रूंचा पाडाव होईल. वाणीत कठोरपणा येईल, तो आवरावा.

विद्याभ्यासात यश येईल. कन्या संततीचा सर्व बाजूंनी भाग्योदय होण्याचा शुभयोग आला आहे. चारही केंद्र आणि त्रिकोणांचे अधिपती शुक्रवारी भाग्यात येत आहेत. पैशाची, भाग्योदयाची, मंगलकार्यांची केलेली खटपट फलदायी होण्याचा दाट संभव आहे. चंद्राचे भ्रमण ६।७।८।९ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शुभ तारखा १७।१८।२१।२२.

◻ ◻ ◻




पृष्ठ १६ वरून

पक्षांच्या आघाडीची कृतीसमिती स्थापन करण्यात येऊन १० जानेवारी ते १७ जानेवारी पर्यंत राज्यात सर्वत्र प्रचंड मेळावे भरवून तामिळ भाषेच्या प्राचीन वैभवाची विद्यार्थ्यांना त्याद्वारे कल्पना देण्यात येईल. प्रहिला मेळावा १० जानेवारी रोजी मद्रास येथे भरविला जाणार आहे. सरकारने स्थापन केलेल्या मंडळाला विद्यार्थ्यांचा सक्त विरोध आहे. कारण ते मंडळ सरकारच्या बाजूनेच मत मांडणार असे त्यांना ठामपणे वाटते.

मुख्यमंत्री आता 'आपला व आपल्या पक्षाचा इंग्रजीला विरोध नाही, जोपर्यंत इंग्रजी आवश्यक आहे तोपर्यंत ते ठेवले जाईल.' अशी विधाने करीत आहेत, तर शिक्षणमंत्री नेडुनझेडियन यांचा सवाल आहे, "आम्ही इंग्रजीवर बंदी घातली आहे काय बोला ?" 'जगातील अनेक नोबेल पारितोषिक विजेते इंग्रजी न जाणताही फक्त मातृभाषेतून लिखाण करूनही जागतिक कीर्ती संपादन करू शकतात. म्हणूनच तामिळ माध्यमामुळे विद्यार्थ्यांवर काही परिणाम होणार नाही असे मला वाटते !' अशी ही त्यांची मल्लिनाथी. शिवाय इयत्ता तिसऱ्या इयत्तेपासून इंग्रजी हा सक्तीचा विषय असल्याने उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांवरही त्याचा परिणाम होणार नाही ही पुस्ती ते जोडतात.

गांधीजी, सत्यमूर्ती व श्री के. कामराज हे मातृभाषेतून शिक्षण दिले जावे या मताचे पुरस्कर्ते. डी. एम्. के. सध्या त्यांच्या नावाचा आधार घेत आहे. मुख्यमंत्री विद्यार्थ्यांना वरील तिघांचे विचार सांगत असतानाच विनंती करतात, 'तामिळ माध्यमातून शिका आणि आठवड्यातून दोन ते तीन तास इंग्रजीच्या अभ्यासाला द्या. यातच तुमचा फायदा आहे !'

अलीकडेच मंत्रिमंडळाची बैठक होऊन त्यात, तामिळ माध्यमातून शिक्षण घेतलेल्यांना जरी सरकारी नोकऱ्यात प्राधान्य देण्यात येणार असले तरी या माध्यमातून शिक्षण पूर्ण केलेले आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास इंग्रजी माध्यमवाल्यांना संधी देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

पण यामुळे कोणाचेही समाधान झालेले नाही. 'तुम्ही तामिळ माध्यम स्वीकारणार काय, तरच सरकारी महाविद्यालयात प्रवेश मिळेल,' 'ज्यांचे माध्यम तामिळ नाही त्यांना सरकारी नोकऱ्या नाहीत', 'इंग्रजी शिकू इच्छिणाऱ्यांनी खाजगी महाविद्यालयातून शिक्षण घ्यावे, सरकारी महाविद्यालयांकडे त्यांनी येऊ नये, त्यांना सरकार शिष्यवृत्या देणार नाही', आणि 'जी महाविद्यालये तामिळ माध्यमाचा स्वीकार करणार नाहीत त्यांना अनुदान मिळणार नाही' अशा प्रकारच्या विधानांची

सरकारने गेल्याच वर्षापासून खैरात चालू केली होती. त्यामुळेच सरकारने धोरणात थोडा फार बदल केला असला तरी विद्यार्थ्यांना सरकारबद्दल विश्वास कसा वाटावा.

मद्रासमधील एक विद्यार्थी नेता मला म्हणाला, 'सरकार विद्यार्थ्यांना नेहमी राजकारणापासून दूर रहाण्याचा सल्ला देते. सरकारनेही शिक्षणक्षेत्रापासून दूर रहावे- "इट इज नन ऑफ देअर बिझनेस"- हा प्रश्न शिक्षणतज्ञ आणि विद्यार्थ्यांचे सार्वमत घेऊन सोडविण्यात यावा!'

एक प्राध्यापक म्हणाले-' फक्त तामिळ' ('तामिळ अलोन')चे पडसाद तामिळनाडू बाहेर राहाणाऱ्या तामिळ भाषिकांवर उठतील आणि 'मराठी अलोन' 'बांगला अलोन' आदी वाद पुढे आल्याशिवाय रहाणार नाहीत.'

माजी मुख्यमंत्री श्री. भक्तवत्सलम म्हणाले 'आमचा कोणतीही भाषा लादण्याला सक्त विरोध आहे. माध्यमाचा प्रश्न राजकारणातीतच असायला पाहिजे' तर तामिळनाडू संघटना काँग्रेसचे अध्यक्ष श्री. पी. कक्कन यांना असे वाटते की सरकार लोकांच्या 'फ्रिडम ऑफ एक्सप्रेशन'वर गदा आणीत आहे. एक पालक म्हणाले 'विद्यार्थ्यांनाच त्याचे माध्यम स्वीकारण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. कारण त्यांना वाटणाऱ्या त्यांच्या भवितव्याची भीती साधार आहे. तामिळ माध्यमामुळे त्यांच्या उच्च शिक्षणाच्या संधीवर मर्यादा पडणार आहेत. केंद्रीय नोकऱ्याबाबतही ते मागे पडतील.' तर 'युनिव्हर्सिटी बोर्डा'चे एक सदस्य म्हणाले की, बोर्डाच्या मते द्विभाषा पद्धतीच अमलात असणे आवश्यक आहे. कारण तामिळनाडूत अनेक अ-तामिळ भाषिक आहेत आणि राज्यातील अनेक विद्यार्थी दुसऱ्या राज्यात नोकरी-धंद्या निमित्ताने जातात तेव्हा त्यांचाही विचार केला जावा म्हणून दोन्ही टोकांना न जाता द्विभाषा पद्धतीचा ('Two Language Formula') अवलंब करणे आवश्यक आहे.

'कामराज यांना वाटते की डी. एम्. के. ला विरोध करणाऱ्यांना ठोकून काढण्याची प्रवृत्ती हेच यामागचे कारण आहे. माध्यमाचा प्रश्न सरकारने प्रतिष्ठेचा करू नये असेही ते कळकळीचे आवाहन करतात.

पण यातही सर्वात बोलक्या प्रतिक्रिया आहेत त्या ज्यांचा या प्रश्नाशी प्रत्यक्ष संबंध आहे त्या विद्यार्थ्यांच्या. तामिळ माध्यमाच्या 'सक्ती'मुळे अनेकांना उच्च शिक्षणाला व परदेशी जाण्याच्या संधीला मुकावे लागेल, त्याचप्रमाणे केंद्रीय नोकऱ्या मिळविण्याबाबतही ते मागे पडतील, असेच मला भेटलेले बहुतेक सर्व विद्यार्थी म्हणत होते. लॉ कॉलेजची एक विद्यार्थीनी म्हणाली, 'काही वर्षांपूर्वी राजगोपालाचारी म्हणाले होते की इंग्रजी भाषा ही भारताला सरस्वतीची देणगी लाभली आहे. अनेक वर्षांपूर्वीच इंग्रजी ही भारतीय भाषा झाली असून ती आता परकीय भाषा राहिलेली नाही.'

एका कॉलेजचे प्राचार्य सांगत होते, 'इंग्रजीमुळे आमची मुले जॉबची ऑफर

असलेल्या शेजारच्या राज्यात जाऊ शकतात. पण सरकारच्या नव्या धोरणामुळे विद्यार्थ्यांचा बळी दिला जाणार आहे. आपल्या बहुभाषी देशात असे होणे हे देशाच्या हिताचे नाही आधीच आमच्या राज्याने हिन्दीला विरोध केला, आंदोलने पेटली, आता इंग्रजीला विरोध करून राज्याचे अतोनात नुकसान होईल. आमचे सुज्ञ राज्यकर्ते अजूनही योग्य तो निर्णय घेतील अशी आशा आहे. '

काही पालकही या प्रश्नावर रागारागाने बोलत होते. 'तामिळ माध्यम न स्वीकारल्यास अनुदान बंद होईल ही शिक्षण मंत्र्यांची भाषा चिथावणीखोर नाही-तर काय ? चिथावणी द्यायची आणि नंतर कायद्याचा आधार घेऊन हवे ते प्रकार करायचे, बळी घ्यायचे हे सरकारला शोभत नाही. ' एक पालक. पालक असलेला एक सरकारी अधिकारीही सरकारविरुद्ध बोलत होता (अर्थातच खाजगीत) 'म्हणे करुणनिधींचा मुलगा तामिळ माध्यमाच्या विश्वविद्यालयात जातो, पण याने हा प्रश्न कसा सुटणार, किती आमदार व खासदार त्याच्या तत्त्वाशी सुसंगत वागतात, जनतेला तामिळ माध्यम स्वीकारायला सांगायचे व आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करायचे वा उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवायचे ही काय योग्य गोष्ट आहे ? या प्रश्नावर डी. एम्. के. बरोबर अभंग काँग्रेसही दोषी आहे, केंद्र सरकारनेही अ-हिन्दी लोकांना चुचकारण्याचे घातक धोरण अवलंबिले आहे त्याचाही फेरविचार झाला पाहिजे. नव्हे हे सर्व बंद झाले पाहिजे. अगोदरच इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्यांची अवस्था भयानक. मग नोकऱ्या देताना तामिळ माध्यमवाल्यांची काय अवस्था होईल ? "

तामिळ माध्यमाला पाठिंबा असणारे म्हणतात, 'तामिळशिवाय तरणोपाय नाही, तामिळ नाही तर प्रगती नाही. ज्ञान बहुजन समाज, गोरगरीबांपर्यंत पोहचणे आवश्यक असेल तर तामिळचा माध्यम म्हणून स्वीकार केलाच पाहिजे. गांधीजींनीही 'मातृभाषेतून शिक्षण' या तत्त्वाचा पुरस्कार केला होता. तामिळ ही अत्यंत प्रगल्भ भाषा आहे. या भाषेतील वाङ्मय सर्वमान्य आहे ! नुकतीच पॅरिसमध्ये जागतिक तामिळ काँग्रेस झाल्याचीही अनेकजण आठवण करून देत होते.

करुणानिधींची भेट घेण्याचा प्रयत्न केला पण शक्य झाले नाही. तेव्हा त्यांचे याबाबतचे काही विचार कळू शकतील काय म्हणून डी. एम्. के. च्या एका प्रवक्त्याची भेट घेतली तेव्हा करुणानिधींच्या विचारांचा थोडा सुगावा लागू शकला. करुणानिधींचे असे म्हणणे आहे की माध्यम आणि नोकऱ्या, बेकारीचा प्रश्न एक करून चालणार नाही. आज देशात अनेक सुशिक्षित, इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेले लक्षावधी तरुण बेकार आहेत. हे सर्व प्रश्न 'साउंड इकॉनॉमिनेच सुटणार आहेत. ' आमचे सरकार नोकऱ्यातील जागा वाढविण्याचा प्रयत्न करील. ' हे सर्व असे असले तरी शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक व इतर लोक यांचा सर्व-

साधरणपणे (बहुमताने) कल इंग्रजी माध्यमाकडेच आहे.

तसे पाहता मातृभाषा माध्यम करणे यात काही वावगे आहे असे नव्हे. इतर अनेक राज्यांना अशा प्रकारचे ठराव मंजूर केले आहेत. काही ठिकाणी यांच्या अंमलबजावणीलाही सुरुवात झाली आहे. एवढेच नव्हे तर सरकारी नोकरी मिळविण्याकरिता त्या राज्यांच्या भाषेचा गंध असणे ही कसोटी असणे यातही गैर काही नाही. भारतीय राज्य घटनेनेच हे मान्य केलेले आहे. पण बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजीत कच्चे असूनही इंग्रजीमुळे मिळणारे फायदे गमवायला तयार नाहीत. देशातील सर्वच ठिकाणचे असे अनेक विद्यार्थी आहेत की तो इंग्रजी की मातृभाषा या पर्यायात इंग्रजीचाच स्वीकार करतात. त्यामुळेच विद्यार्थी, सरकारच्या भाषा धोरणावर कमालीचे नाराज आहेत. आणि त्यातच राज्य सरकारची भूमिका थोडी नरम होण्याऐवजी कडकच होत चालली आहे. 'शिक्षेचा कायदा,' 'बंगालच्या उपसागरात बुडविले जाणे' अशी बेजबाबदार विधाने यांचीही भर यात पडली आहे. तामिळ माध्यमातून शिकणाऱ्यांना नोकऱ्यांबाबत अग्रक्रम ही घोषणा जरी मुख्यमंत्री श्री. करुणानिधी यांनी विधानसभेत केली असली. तरी एक पाहणी अभ्यासानुसार असे दिसते की अशांनाही नोकऱ्या मिळण्याच्या दृष्टीने जडच जाईल. सरकार दरवर्षी तामिळ माध्यमातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या २०० जणांना सरकारी नोकरीत भरती करते. गेल्यावर्षी तामिळ माध्यम घेऊन ३७०० पदवीधर बाहेर पडले. ७२ साली सुमारे २ हजार शास्त्राचे, तामिळ माध्यमातून शिक्षण घेतलेले पदवीधर बाहेर पडतील. शिवाय हजारो पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या नोकऱ्यांबाबत अर्ज करतील. सध्या सरकारी नोकरीसाठी अर्ज केलेल्यांना नोकरी मिळण्याचे जे प्रमाण आहे ते आहे. वीस अर्जदारात एकाला नोकरी. इतरांना अर्थातच नोकरीच्या शोधार्थ बाहेर जावे लागते. त्यामुळे तामिळ माध्यमामुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचा होईल असे सर्वांना वाटते. सरकारने नव्या जागा निर्माण करण्याचे भले आश्वासन दिले असेल, पण सरकार अशा किती म्हणून जागा निर्माण करू शकेल. म्हणूनच विद्यार्थी, पालक, शिक्षक आदी सर्वांनाच या प्रश्नाने पुरते ग्रासलेले आहे. सध्या सुट्टी असल्याने राज्यात थोडी फार शांतता आहे खरी पण ती भंग पावणारच नाही असे सांगता येत नाही. सरकारचे धोरण आणि विद्यार्थ्यांचा 'उग्रपणा' यावरच हे सर्व अवलंबून रहाणार आहे. नाहीतर पुन: १९६५ सालची पुनरावृत्ती होण्याचे टळेल असे दिसत नाही. ◻ ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. H-M 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

प्रसिद्धी : २६ जानेवारी १९७१.

पूर्वग्राहकांनी आपल्या प्रती
२७ जानेवारीपासून कार्यालयातून
नेण्याची व्यवस्था करावी.

परगावच्या पूर्वग्राहकांच्या प्रती
३० जानेवारीपासून रवाना
करण्यास सुरुवात होईल.]

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.